# निमित्तोपादान

(मराठी)



डॉ॰ हुकमचन्द भारिल्ल

# निमित्तोपादान

लेखक :
डॉ. हुकमचन्द भारिल्ल
शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न, एम.ए., पी एच.डी.

मराठी अनुवादक :
दिनेशभाई एम. शहा
एम.ए., एल एल.बी., मुम्बई

प्रकाशक :
पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट
ए-४, बापूनगर, जयपुर-३०२ ०१५ (राज.)

**मराठी :**
प्रथम संस्करण ०३ हजार
(२६ जनवरी, १९९७)

**हिन्दी :**
प्रथम दोन संस्करण १७ हजार

एकूण २० हजार

किंमत : ५.०० रुपये मात्र

**प्रस्तुत संस्करण सवलतीमध्ये मिळण्यासाठी दान देणाऱ्यांची सूची**

| | |
|---|---|
| १. श्री कान्तिलालजी माणकचन्दजी गाँधी, पुणे | १,०००/- |
| २. श्री रामचन्दजी खेमचन्दजी शहा, खाडेलकर, सोलापुर | ५०१/- |
| ३. सौ. चन्दनबेन केसूभाई शहा, सोलापुर | ५०१/- |
| ४. श्री महेन्द्र भाई शहा, सोलापुर | ५००/- |
| ५. श्री दिगम्बर जैन कुन्दकुन्द कहान स्वाध्याय मन्दिर, करेली | २५१/- |
| ६. श्री रामकिशनजी जैन, गुढ़ाचन्दजी | २५०/- |
| ७. श्री रतनचन्दजी गोतमचन्दजी जैन, सोलापुर | १०१/- |
| ८. सौ. नंदा महेन्द्रभाई फडे. सोतापुर | १०१/- |
| कुल योग | ३,२०५/- |

मुद्रक :
**जयपुर प्रिन्टर्स प्रा. लि.**
एम. आई. रोड, जयपूर

# प्रकाशकीय

विश्वातील प्रत्येक दर्शनामध्ये अन्य दार्शनिक विषयांबरोबर कार्यकारण व्यवस्थेची चर्चा निश्चितच मिळते. जैनदर्शनामध्ये देखील ही चर्चा उपादान-निमित्तरूपाने मिळते. म्हणून या महत्त्वपूर्ण विषयावर जैन समाजाचे सुविख्यात तार्किक विद्वान डॉ. हुकमचन्दजी भारिल्ल यांची कृति "निमित्तोपादान" चे मराठी भाषेमध्ये प्रकाशन करीत असतांना आम्हाला विशेष आनंदानुभूती होत आहे.

जैनतत्त्वज्ञानाच्या आध्यात्मिक क्षेत्रामध्ये आध्यात्मिकसत्पुरुष पूज्य श्री कानजीस्वामींच्या उदयाबरोबर जे विषय खूप चर्चिले गेले, त्यामध्ये मुख्य आहेत - क्रमबद्धपर्याय, निश्चय-व्यवहार आणि उपादान-निमित्त. ह्यांच्या संदर्भामध्ये गावोगावी चालणाऱ्या चर्चेने वादविवादाचे रूप घेतले होते. जशी-जशी ही आध्यात्मिक क्रांति विस्तारत गेली, तसे-तसेच ह्या वादविवादाने उग्र रूप धारण केले.

वादविवादाच्या खोलात शिरल्याने एक तथ्य सामोरे आले की विषयाचा परिचय नसणेच वादविवादाचे मूळ कारण आहे. म्हणून हा निश्चय केला की, जर ह्या विषयाला आगमाच्या प्रकाशामध्ये सोप्या-सरळ शैलीमध्ये लोकांसमोर प्रस्तुत केले तर वादविवाद सहजच शांत होईल.

जेव्हा डॉ. हुकमचन्द भारिल्ल ह्यांनी ह्या विषयावर गावोगावी सरळ-सोप्या पद्धतीने सप्रमाण प्रवचनं केली तेव्हा त्याचा अनुकूल प्रभाव समोर आला. तेव्हा असे वाटले की, जर ह्या विषयाला लिखितरूपाने देखील प्रस्तुत केले तर सफलता अवश्य मिळेल. परिणामस्वरूप 'क्रमबद्धपर्याय' आणि 'परमभावप्रकाशक नयचक्र' सारख्या कृती समोर आल्या. ज्यांनी तत्संबंधी वादविवादांना जवळजवळ संपुष्टात आणले. त्याच क्रमामधील ही 'निमित्तोपादान' कृती आहे.

या कृतिचे हिन्दी भाषेमध्ये प्रथम संस्करणच १२ हजारांच्या मोठ्या प्रमाणात प्रकाशित झाले होते. वीतराग-विज्ञान मासिकेच्या सम्पादकीय रूपामध्ये ही ६ हजार प्रति प्रकाशित झाल्या, परन्तु आता हे संस्करण संपुष्टात आल्याने हिन्दीमध्ये ही दूसरे संस्करण शीघ्रच प्रकाशित होत आहे, मराठी भाषिकांच्या सोईसाठी हा मराठी अनुवाद प्रकाशित केला जात आहे.

पं. दिनेशभाई एम. शहा. आणि त्यांची धर्मपत्नी (डॉ.) सौ. उज्ज्वला शहा हे दोघे ही अध्यात्मप्रेमी व सखोल अभ्यासू आहेत. डॉ. हुकमचन्दजी भारिल्ल व पं. रतनचन्दजी भारिल्ल द्वारा लिहिलेल्या जवळजवळ सर्वच कृतिंचे मराठी भाषांतर यांनी आपल्या स्वतःच्या आवडीने निस्पृहतेने केले आहे. या कृतिचा ही अनुवाद यांनीच केला आहे, म्हणून आम्ही त्यांचे हार्दिक आभारी आहोत.

प्रस्तुत प्रकाशनाच्या किंमत-सवलतीत ज्या महानुभावांकडून आर्थिक-सहयोग प्राप्त झाला आहे, त्यांचे आम्ही अंतःकरणपूर्वक आभार मानतो. जयपुर प्रिन्टर्स प्रा. लि., जयपुर यांनी ह्या पुस्तकाचे सुन्दर मुद्रण केल्याबद्दल त्यांचे अभिनन्दन केल्याशिवाय रहावत नाही.

आम्हास पूर्ण विश्वास आहे कि या कृतिच्या माध्यमातून आध्यात्मिक समाज कार्यकारण व्यवस्थेचे स्वरूप समझून आपले कल्याण करून घेईल.

**– नेमीचंद पाटनी**
महामंत्री, पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. निमित्तोपादान : एक चिन्तन | ५ |
| २. निमित्तोपादान : काही प्रश्नोत्तरे | २७ |
| ३. परिशिष्ट-१. उपादान-निमित्त दोहा : कविवर बनारसीदासजी | ५१ |
| ४. परिशिष्ट-२. उपादान-निमित्त दोहा : भैया भगवतीदासजी | ५२ |

# निमित्तोपादान : एक चिंतन

मुक्तीच्या मार्गामध्ये ज्या महत्त्वपूर्ण विषयांचे सम्यक् परिपूर्ण ज्ञान अत्यन्त आवश्यक आहे, त्यामधील 'उपादान-निमित्त' सुद्धा एक असा महत्त्वपूर्ण विषय आहे की, ज्याच्या सम्यक् ज्ञानाशिवाय परावलंबी दृष्टी आणि वृत्ती समाप्त होत नाही, स्वावलंबनाचा भाव जागृत होत नाही, मुक्तीच्या मार्गाचा सम्यक् पुरुषार्थ सुद्धा स्फुरायमान होत नाही.

'क्रमबद्धपर्याय' आणि 'निश्चय-व्यवहारा' प्रमाणेच 'उपादान-निमित्त' हा देखील आजचा एक बहुचर्चित विषय आहे; ज्याची चर्चा पूर्वी विद्वज्जनांमध्ये सुद्धा आपापसात होत नव्हती, परंतु आज ती सर्वसामान्यांमध्ये सुद्धा चर्चिली जात आहे. ह्याच्या चर्चेने एकीकडे लोकांची ह्या संदर्भात जिज्ञासा जागृत केली, त्या संबंधातील साहित्याचा अभ्यास करण्यास उद्युक्त केले, तर दुसरीकडे काही वादविवादही निर्माण झाले. आज ह्याच्या चर्चेने पक्ष-विपक्षाचे रूप घेतले आहे. ह्या कारणामुळेच ह्या संबंधी ज्या-ज्या वेळेस एखादा बोलतो किंवा लिहितो तेव्हा त्याच्या बोलण्यामध्ये किंवा लिखाणामध्ये पक्ष-विपक्षाचा सूर येऊ लागतो आणि समाजसुद्धा त्याला पक्ष किंवा विपक्षाच्या रुपातच आत्मसात करतो.

आजचे हे द्वंद्व संघर्षामध्ये परावर्तित होऊ नये ह्याकरिता हे अत्यन्त आवश्यक आहे की, आगमाच्या प्रकाशात ह्या विषयावर गांभीर्यपूर्ण निष्पक्षपणे मंथन केले जावे आणि समाजासमोर सरळ-सोप्या भाषेमध्ये सादर केले जावे. ह्या विषयाचा सर्वांगिण अभ्यास किंवा चिंतनच द्वंद्व किंवा संघर्षापासून वाचण्याचा एकमेव उपाय आहे. वस्तुस्वरुपाच्या संपूर्ण ज्ञानाकरिता देखील उपादान-निमित्ताची तर्कसंगत, आगमसंमत सुव्यवस्थित जाणीव अत्यन्त आवश्यक आहे.

'निश्चय-व्यवहार' आणि 'क्रमबद्धपर्याया' सारखे विवादास्पद विषय देखील जेव्हा आगमाच्या प्रकाशामध्ये सरळ आणि सोप्या भाषेत प्रस्तुत केले

गेले, तेव्हा निव्वळ विद्वद्वर्ग आणि समाजामध्येच कौतुक झाले असे नसून त्यासंबंधी वादविवाद देखील जवळ-जवळ लुप्त झाले. म्हणून मला पूर्ण खात्री आहे की, जर उपादान-निमित्ताचा देखील अशाप्रकारे अभ्यास केला गेला तर अपेक्षित लाभ अवश्य होईल.

उपादान-निमित्ताच्या सम्यक् परिपूर्ण ज्ञानाच्या अभावामुळे जिनागमामध्ये प्रतिपादित वस्तुव्यवस्थेला देखील सम्यक्प्रकारे समजणे अशक्य आहे. उपादान-निमित्तासंबंधीच्या सम्यक् ज्ञानाच्या अभावामुळे एक तर निमित्ताला कर्ता मानले जाते किंवा त्याचे अस्तित्वच मानले जात नाही; म्हणून हे आवश्यक आहे की, आपण उपादान-निमित्ताकडे द्वंद्वाच्या स्वरूपात न पाहता, त्याच्या पक्ष किंवा विपक्षामध्ये भाग न घेता, त्याच्या स्वरूपाबद्दलच आगमाच्या प्रकाशात विचार करावा. त्याचे स्वरुप सम्यक्रुपाने स्पष्ट झाल्याने संपूर्ण परिस्थिती सहजपणे सुस्पष्ट होईल.

जगाचा प्रत्येक पदार्थ परिणमनशील आहे. पदार्थाच्या ह्या परिणमनशील स्वभावाला पर्याय अथवा कार्य असे म्हणतात. ह्या परिणमनाला कर्म, अवस्था, हालत, दशा, परिणाम, परिणति, कार्य इत्यादी नावांनी संबोधले जाते.

कार्य कारणपूर्वकच होते, आणि कार्याच्या उत्पादक सामुग्रीलाच कारण म्हटले जाते. ती कार्याची उत्पादक सामुग्री उपादान आणि निमित्ताच्या रुपामध्ये असते. हेच कारण आहे की जिनागमामध्ये उपादान आणि निमित्ताची चर्चा कारणांच्या रुपामध्ये झाली आहे आणि ह्यामुळेच कारणं देखील दोन प्रकारची मानली गेली आहेत :-

(१) उपादानकारण आणि (२) निमित्तकारण

जो स्वतः कार्यरुपाने परिणमित होतो, त्याला उपादानकारण म्हणतात आणि जो स्वतः तर कार्यरुप परिणमित होत नाही, परंतु कार्याच्या उत्पत्तिमध्ये अनुकूल असण्याचा आरोप ज्यावर येऊ शकतो, त्याला निमित्तकारण म्हणतात. जसे - घटरुप कार्याचे माती उपादानकारण आहे आणि चाक, दंडुका व कुंभारादी निमित्तकारण आहेत.

ज्या पदार्थामध्ये कार्य निष्पन्न होते; त्या पदार्थाला उपादानकारण आणि जे कार्य निष्पन्न झाले आहे त्याला उपादेय म्हणतात. तसेच निमित्तकारणाच्या अपेक्षेने कथन करत असता त्याच कार्या (उपादेया)ला नैमित्तिकसुद्धा म्हटले जाते. अशाप्रकारे आपण पाहतो की, एकाच कार्याला उपादानकारणाच्या अपेक्षेने उपादेय आणि निमित्त कारणाच्या अपेक्षेने नैमित्तिक म्हटले जाते. जे घटरुप कार्य मातीरुप उपादानकारणाचे उपादेय कार्य आहे. तेच घटरुप कार्य कुंभाररूप निमित्तकारणाचे नैमित्तिक कार्य आहे. तात्पर्य हे आहे की माती आणि घटामध्ये उपादान-उपादेय संबंध आहे तसेच कुंभार आणि घटामध्ये निमित्त-नैमित्तिक संबंध आहे.

जर आपण त्याला सम्यग्दर्शनरूप कार्यावर घटित केले तर अशाप्रकारे म्हणावे लागेल – आत्मद्रव्य किंवा त्याचा श्रद्धागुण उपादान आहे आणि सम्यग्दर्शन उपादेय आहे; अशाचप्रकारे मिथ्यात्व कर्माचा अभाव अथवा सद्‌गुरुचा उपदेश निमित्त आहे आणि सम्यग्दर्शन नैमित्तिक आहे.

येथे उपादेय शब्दाचा अर्थ 'ग्रहण करण्यायोग्य' असा करता कामा नये. कारण हे प्रकरण हेयोपादेय दाखविणारे प्रकरण नाही. येथे तर कार्य-कारण संबंधीचे प्रकरण असल्याने फक्त हे स्पष्ट केले जात आहे की ज्या कार्याला निमित्ताच्या अपेक्षेने नैमित्तिक म्हटले जात आहे, त्याच कार्याला उपादानाच्या अपेक्षेने उपादेय म्हटले जात आहे.

अशाप्रकारे हे निश्चित झाले की उपादान-उपादेय संबंध आणि निमित्त-नैमित्तिक संबंध कारण-कार्य संबंधाचेच रुप आहे, जे प्रत्येक कारण-कार्य संबंधावर अनिवार्यपणे घटित होते. अशाप्रकारे प्रत्येक कार्य नियमरुपाने उपादेयदेखील आहे आणि नैमित्तिकदेखील आहे. उपादानाच्या अपेक्षेने उपादेय आहे आणि निमित्ताच्या अपेक्षेने नैमित्तिक आहे.

येथे एक प्रश्न उठू शकतो की, जर द्रव्य किंवा गुण उपादान कारण आहे जसे की सम्यग्दर्शनरुप कार्याच्या उदाहरणामध्ये सांगितलेले आहे, तर

विवक्षित कार्य निरंतर उत्पन्न होतच राहिले पाहिजे; कारण जेव्हा कारण उपस्थित आहे तर कार्यदेखील झालेच पाहिजे.

जर ह्याच्या उत्तरामध्ये असे म्हटले गेले की, उपादानकारण तर द्रव्य किंवा गुण असल्याने सदैवच उपस्थित असते, परंतु निमित्तकारण नसल्याने कार्य झाले नाही; जेव्हा निमित्तकारण मिळेल, तेव्हा कार्य संपन्न होईल. असे मानल्याने निमित्तकारणच नियामक (नियंत्रक) कारण ठरेल, कारण त्याच्या असण्या-नसण्यावरच कार्याचे होणे अथवा न होणे हे अवलंबून राहील.

ह्या संकटातून वाचण्याकरिता जर हे म्हटले गेले की, कार्याच्या उत्पत्तिमध्ये तर दोन्ही कारणांची उपस्थिती अनिवार्य असते. तर मग आपण म्हणू की भले दोन्ही कारणांची उपस्थिती अनिवार्य असेल, परंतु नियंत्रक कारण तर निमित्तच झाले ना! कारण त्याची उपस्थिती असल्याने कार्य होते आणि नसल्याने कार्य होत नाही.

अहो! कार्याचे नियंत्रक कारण कोण आहे - हे जाणण्याअगोदर आपण उपादान-निमित्तांना आणि त्यांच्या भेद-प्रभेदांना चांगल्या प्रकारे समजून तर घेऊ, नंतर मग ह्या वादविवादात पडू. असेही होऊ शकेल की, उपादान-निमित्ताच्या भेद-प्रभेदाच्या स्पष्टीकरणामध्ये हा प्रश्न सहजा-सहजी सुटेल. वास्तविक गोष्ट तर अशी आहे की उपादान-निमित्ताच्या भेद-प्रभेदाच्या सम्यग्ज्ञानामध्येच ह्या प्रश्नाचे उत्तर सामावलेले आहे. म्हणून सर्वात प्रथम त्याच्या भेद-प्रभेदाची चर्चा अपेक्षित आहे.

उपादान दोन प्रकारचे असते -

(१) त्रिकाली उपादान आणि (२) क्षणिक उपादान

निमित्तदेखील दोन प्रकारचे असतात.

(१) उदासीन आणि (२) प्रेरक

किंवा

(१) अंतरंग आणि (२) बहिरंग

जे द्रव्य किंवा गुण स्वतः कार्यरुप परिणमित होते, त्या द्रव्याला किंवा गुणाला त्या कार्याचे त्रिकाली उपादानकारण असे म्हणतात.

क्षणिक उपादान कारणं दोन प्रकारची असतात :-

**(क)** द्रव्य आणि गुणामध्ये जो पर्यायांचा प्रवाहक्रम अनादि-अनंत चालत आहे, त्या प्रवाहक्रमामध्ये अनन्तर-पूर्वक्षणवर्तीपर्याय क्षणिक उपादान कारण आहे आणि अनन्तर-उत्तर क्षणवर्तीपर्याय कार्य आहे. त्याला अशाप्रकारे सुद्धा म्हटले जाते की, अनन्तर-पूर्वक्षणवर्ती पयार्याने युक्त द्रव्य कारण आहे आणि अनन्तर-उत्तर क्षणवर्तीपर्यायाने युक्त द्रव्य कार्य आहे.

उक्त संदर्भामध्ये कार्तिकेयानुप्रेक्षाचे निम्न कथन पाहण्यासारखे आहे :-

**पुव्वपरिणामजुत्तं कारणभावेण वट्टदे दव्वं ।**
**उत्तरपरिणामजुदं तं चिय कज्जं हवे णियमा ॥ २३० ॥**

अनन्तर-पूर्वपरिणामाने युक्त द्रव्य कारणरुपाने परिणमित होते आणि अनन्तर-उत्तरपरिणामाने युक्त तेच द्रव्य नियमाने कार्य होते.

हीच गोष्ट अधिक सुस्पष्ट करण्याकरिता सिद्धान्ताचार्य पं. फूलचंदजी म्हणतात "जे अनन्तर-पूर्वपर्यायविशिष्ट द्रव्य आहे, त्याचे उपादान नाव आहे आणि जे अनन्तर-उत्तरपर्यायविशिष्ट द्रव्य आहे, त्याचे कार्य नाव आहे"[१]

**(ख)** त्या समयाच्या पर्यायाची त्याचवेळी होणेरुप योग्यता क्षणिक उपादान कारण आहे आणि ती पर्याय कार्य आहे.

अशातऱ्हेने उपादानकारणं तीन प्रकारची झाली, जी अशाप्रकारे आहेत:-

(१) त्रिकाली उपादानकारण

(२) अनन्तर-पूर्वक्षणवर्ती-पर्यायीचा व्ययरुप क्षणिक उपादानकारण।

(३) तत्समयाची योग्यतारूप क्षणिक उपादानकारण.

क्षणिक उपादानाचे लांबच लांब नाव होत असल्याने त्याला पुढील संक्षिप्त नावांनी देखील उल्लेखिले जाते :-

---

१. जैनतत्त्वमींमासा, पृष्ठ ७५

(क) अनन्तरपूर्वक्षणवर्तीपर्याय

(ख) तत्समयाची योग्यता

उपादानाच्या उल्लेखलेल्या तीन भेदांची स्थिती अधिक स्पष्ट होण्याकरिता खालील चार्ट अधिक उपयोगी आहे.




क्षणिक उपादान कारणाला समर्थ उपादानकारण देखील म्हणतात, कारण त्रिकाली उपादान कारण तर सदैव विद्यमान असते, जर त्यालाच पूर्ण समर्थकारण मानले गेले तर विशिष्ट कार्याची सदैव उत्पत्ति होत राहण्याचा प्रसंग उद्भवेल. अनन्तर-पूर्वक्षणवर्ती पर्यायीचा व्यय आणि त्या समयी ती पर्याय उत्पन्न होण्याची योग्यताच समर्थ उपादान कारण आहे की जिच्याशिवाय कार्याची उत्पत्ति होत नाही आणि जिच्या होण्यामुळे नियमाने कार्याची उत्पत्ति होते.

तत्त्वार्थश्लोकवार्तिकामध्ये उपादानाचे दोन भेद केले गेले आहेत. एक असमर्थ उपादान आणि दुसरे समर्थ उपादान. त्याच्यामध्ये जे समर्थ उपादान आहे, ते नक्कीच कार्याचे जनक असते आणि ते अष्टसहस्त्रीच्या अभिप्रायानुसार अव्यवहित पूर्वपर्याययुक्त द्रव्यरुपच असते.[१]

अशाप्रकारे एवढ्या विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, समर्थ उपादान एकच असते आणि त्याच्यामुळे उत्पन्न होणारे कार्य तेच असते, ज्याचे ते समर्थ उपादान असते. त्यावेळेस त्या कार्याचे जे काही निमित्त असते, त्याच्यामध्ये उपादानाची क्रिया करण्याची मुळी शक्तीच असत नाही, मात्र ते (निमित्त कारण) उपादानाच्या अनुसार होणाऱ्या कार्याचे सूचक असल्याने त्याचे निमित्त म्हटले जाते आणि ह्या आधारे निमित्तानुसार कार्य होते असे व्यवहाराने (उपचाराने) म्हटले जाते."[२]

१. जैनतत्त्वसमीक्षा का समाधान, पृष्ठ १५

२. जैनतत्त्वसमीक्षा का समाधान, पृष्ठ १५

उक्त विवेचनावरुन हे स्पष्ट होते की नियामक कारण त्रिकाली उपादानकारण नाही, परंतु क्षणिक उपादानकारण आहे. निमित्तकारणाला नियामक कारण मानणाऱ्यांनी ह्या गोष्टीकडे विशेष ध्यान दिले पाहिजे.

निमित्ताला नियामक कारणाच्या रुपामध्ये प्रस्तुत करतेवेळी असा तर्क दिला गेला होता की, उपादान तर सदैव विद्यमान असते, जर करता त्यालाच नियामक अथवा समर्थ कारण मानले गेले तर कार्य सतत उत्पन्नच होत राहण्याचा प्रसंग उद्‌भवेल.

उक्त संदर्भामध्ये वस्तुस्थिती अशी आहे की, त्रिकाली उपादान कारणाला उपादान कारण मानून असे म्हटले गले होते की, उपादान तर सदैव असतेच, परंतु क्षणिक उपादान देखील उपादानच आहे जे की सदैव उपस्थित नसते, म्हणून उपादानाला समर्थ कारण मानण्याने कार्य सतत होत राहण्याचा प्रसंग उपस्थित होण्याचा आरोप निराधार आहे; कारण की कार्याचे नियामक कारण तर क्षणिक उपादान आहे, त्रिकाली उपादान नाही.

इथे एक प्रश्न उद्‌भवू शकेल की जेव्हा क्षणिक उपादानच समर्थ उपादान आहे तर मग त्रिकाली उपादानाचे महत्त्वच काय उरले ?

अरे बंधू! बाब अशी आहे की उपादान तर निजशक्तिला म्हणतात. जसे म्हटलेच आहे :-

**उपादान निजशक्ति है, जिय को मूल स्वभाव ।**
**है निमित्त परयोग तैं, बन्यो अनादि बनाव ॥[१]**

शक्ति दोन प्रकाराची असते - द्रव्यशक्ति आणि पर्यायशक्ति. ह्या दोन्ही शक्तिंचे नावच उपादान आहे. पर्यायशक्तिने युक्त द्रव्यशक्तिच कार्यकारी असते. द्रव्यशक्ति नित्य असते आणि पर्यायशक्ति अनित्य. नित्यशक्तिच्या आधारे कार्याची उत्पत्ति मानण्याने कार्याच्या नित्यत्त्वाचा प्रसंग उद्‌भवतो; म्हणून पर्यायशक्तिलाच

१. भैय्या भगवतीदास : उपादान-निमित्त संवाद, दोहा-३

कार्याचा नियामक ठरविला गेला आहे. द्रव्यशक्ति हे दर्शविते की, हे कार्य ह्या द्रव्यातच होते, अन्य द्रव्यामध्ये नाही आणि पर्यायशक्ति हे दर्शविते की, विवक्षित कार्य विवक्षित समयामध्ये होईल. म्हणून ना द्रव्यशक्ति महत्त्वहीन आहे ना पर्यायशक्ति, दोन्हीही महत्वपूर्ण आहेत; परंतु काळाची नियामक पर्यायशक्तिच आहे. काळाचे दुसरे नावदेखील पर्यायच आहे. ही पर्यायशक्ति अनन्तरपूर्वक्षणवर्ती पर्यायाच्या व्ययरूप तसेच तत्समयाच्या योग्यतारूप असते. म्हणून ह्या दोहोंचे देखील नाव क्षणिक उपादान आहे. म्हणूनच क्षणिक उपादानाला कार्याचा नियामक म्हटले गेले आहे. जरकरिता त्रिकाली उपादानालादेखील एकत्रित करुन जर म्हणायचे झाले तर असे म्हटले जाईल की, पर्यायशक्तियुक्त द्रव्यशक्ति कार्यकारी आहे; परंतु ह्यातदेखील नियामक कारणाच्या रुपामध्ये तर पर्यायशक्तिरूप क्षणिक उपादानच आहे. जर निमित्ताला देखील ह्यामध्ये एकत्रित करुन म्हणावयाचे ठरले तर अशाप्रकारे म्हटले जाऊ शकते की, सहकारीकारणसापेक्ष विशिष्टपर्यायशक्तिने युक्त द्रव्यशक्तिच कार्यकारी आहे.

उक्त संदर्भामध्ये जयपूर (खानियाँ) तत्त्वचर्चेमध्ये सिद्धान्ताचार्य पंडित फूलचंदजींनी अनेक न्यायशास्त्रीय दाखले प्रस्तुत करताना त्याचे जे स्पष्टीकरण केले आहे त्याचा थोडक्यात महत्वूर्ण अंश अशाप्रकारे आहे :-

"श्री राजवार्तिकमध्ये म्हटले आहे - **यथा मृदः स्वयमन्तर्घटभवन-परिणामाभिमुख्ये दण्ड-चक्र-पौरुषेयप्रयत्नादि निमित्तमात्रं भवति, यतः सत्स्वपि दण्डादिनिमित्तेषु शर्करादिप्रचितो मृत्पिण्डः स्वयमन्तर्घटभवन-परिणामनिरुत्सुकत्वान्न घटो भवति। अतो मृत्पिण्ड एव बाह्यदण्डादि निमित्तसापेक्ष अभ्यन्तरपरिणामसान्निध्याद् घटो भवति न दण्डादयः इति दण्डादिनां निमित्तमात्रत्त्वम्।**

**अर्थ** - ज्याप्रमाणे मातीमध्ये स्वयं अंतरंगातून मडके (घडा) होणेरूप परिणामाच्या सन्मुख झाल्याने काठी, चाक आणि पुरुषार्थ (मनुष्याचे प्रयत्न) आदि निमित्तमात्र असतात, कारण काठीआदि निमित्तांची उपस्थिती असूनदेखील वाळूचे बाहुल्य असलेला मातीचा पिण्ड (गोळा) स्वयं अंतरंगातून

मडके होणेरुप परिणामाने (पर्यायाने) निरुत्सुक असल्या मुळे (मडके पयार्यरूप परिणमनाच्या सन्मुख नसल्या मुळे) मडके होत नाही; म्हणून बाह्यत: काठीआदि निमित्तसापेक्ष मातीचा पिण्ड (गोळा) च अंतरंगातून मडके होणे रूप परिणामाचे सान्निध्य असल्याने मडके होतो, काठीआदि मडके होत नाही, म्हणूनच काठी आदि निमित्तमात्र आहेत.

हे प्रेरक निमित्तांच्या निमित्तपणाचे स्पष्टीकरण आहे. ह्या उल्लेखामध्ये मोठ्या समर्थ शब्दांद्वारे हे स्पष्ट केलेले आहे की, ना तर सर्व प्रकारची मातीदेखील मडक्याचे उपादान आहे आणि ना तर पिण्ड, स्थास, कोश, कुसुल आदि पर्यायांच्या अवस्थारुपाने परिणत माती मडक्याचे उपादान आहे; परंतु जी माती अनन्तर समयामध्ये मडके पर्यायरुपाने परिणत होणार आहे, फक्त तीच माती मडकेपर्यायीचे उपादान आहे. ह्याच तथ्याला राजवार्तिकाच्या उक्त उल्लेखाद्वारे स्पष्ट केले गेले आहे. मातीची अशी अवस्था प्राप्त झाल्यावर ती नियमाने मडक्याचे उपादान बनते. ह्याच कारणास्तव तत्त्वार्थवार्तिकाच्या उक्त उल्लेखाद्वारे हे स्पष्ट केले गेले आहे की, जेव्हा माती मडके पर्यायीच्या परिणमन-सन्मुख होते, तेव्हा काठी, चाक, मनुष्य-प्रयत्नांच्या निमित्तपणाची स्वीकृति केली गेली आहे आणि अन्य काळामध्ये त्यांचा निमित्त म्हणून स्वीकार केला गेलेला नाही.

ह्या तथ्याला स्पष्ट करताना प्रमेयकमलमार्तंडामध्ये लिहिले आहे -

**यच्चोच्यते शक्तिर्नित्याऽनित्या वेत्यादि। तत्र किमयं द्रव्यशक्तौ पर्याये वा प्रश्नः स्यात्, भावानां द्रव्य-पर्यायशक्त्यात्मकत्वात्। तत्र द्रव्यशक्तिर्नित्यैव, अनादिनिधन स्वभावत्वाद् द्रव्यस्य। पर्यायशक्तिस्त्वनित्यैव, सादिपर्यवसानत्वात् पर्यायाणाम्। न च शक्तेर्नित्यत्वे सहकारिकारणानपेक्षयैवार्थस्य कार्यकारित्वानुषंगः, द्रव्यशक्तेः केवलायाः कार्यकारित्वानभ्युपगमात्। पर्यायशक्तिसमन्विता हि द्रव्यशक्तिः कार्यकारिणी, विशिष्टपर्यायपरिणतस्यैव द्रव्यस्य कार्यकारित्त्वप्रतीतेः। तत्परिणतिश्चास्य सहकारिकारणापेक्षया इति**

पर्यायशक्तेस्तदैव भावान्न सर्वदा कार्योत्पत्तिप्रसंगः सहकारि-कारणापेक्षावैयर्थ्य वा।

**- प्रमेयकमलमार्तंड २,१ पृष्ठ-१८७**

आणि जर हे म्हटले जाते की, शक्ति नित्य आहे कि अनित्य आहे इत्यादि. तेव्हा काय हा द्रव्यशक्ति किंवा पर्यायशक्तिच्याविषयी प्रश्न आहे? कारण पदार्थ द्रव्य-पर्याय शक्तिस्वरूप असतात. त्यांच्यातील द्रव्यशक्ति नित्यच असते, कारण द्रव्य अनादिनिधन स्वभाववाले असते. पर्यायशक्ति तर अनित्यच आहे, कारण पर्याय सादिसान्त असते. जरकरिता असे म्हटले गेले की, शक्ति नित्य आहे तर सहकारी कारणांची अपेक्षा केल्याशिवायच कार्यकारीपणाचा प्रसंग उद्‌भवेल - असे तर होत नाही, कारण फक्त द्रव्यशक्तिच्या कार्यकारीपणाचा स्वीकार केलेला नाही. परंतु पर्यायशक्तिने युक्त द्रव्यशक्ति कार्य करण्यामध्ये समर्थ असते. कारण विशिष्ट पर्यायीने परिणत द्रव्याचाच कार्यकारीपणा प्रतीत होतो. आणि त्याची परिणती सहकारीकारण सापेक्ष असते, कारण पर्यायशक्ति तेव्हाच उद्‌भवते, त्यामुळेच न की सर्वदा (सदैव) कार्याच्या उत्पत्तीचा प्रसंग उद्‌भवतो आणि न की सहकारी कारणांच्या अपेक्षेच्या निष्फळतेचा प्रसंग उद्‌भवतो.

अशातऱ्हेने हे लक्षात येते की, सहकारीसापेक्ष विशिष्ट पर्यायशक्तिने युक्त द्रव्यशक्तीच कार्यकारिणी मानली गेली आहे, केवळ उदासीन किंवा प्रेरक निमित्तांच्या जोरावर फक्त द्रव्यशक्तिनेच द्रव्यामध्ये कार्य होत नाही. जर द्रव्यशक्तिला बाह्यनिमित्ताच्या जोरावर कार्यकारी मानले गेले तर हरभऱ्यापासून गव्हाची उत्पत्ति होऊ लागेल, कारण गहू स्वतः द्रव्य नाही. परंतु ती पुद्‌गल द्रव्याची एक पर्याय आहे; म्हणून गहू पर्याय विशिष्ट पुद्‌गलद्रव्य बाह्यकारण सापेक्ष गव्हाच्या अंकुरादि कार्यरुपाने परिणित होते. जर विशिष्ट पर्याय रहित द्रव्य सामान्याच्या निमित्ताच्या जोरावर गव्हाच्या, अंकुरादि पर्यायांची उत्पत्ति मानली गेली तर जे पुद्‌गल हरभरारूपाने आहे, ते पुद्‌गल असल्याने त्यातूनही गहू रुप पर्यायीची उत्पत्ति होऊ लागेल; म्हणून जे विविध लौकिक प्रमाण देऊन

हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो की जेव्हा जसे प्रबळ निमित्त मिळते, तेव्हा द्रव्याला निमित्तानुसार परिणमन करावेच लागते; परंतु हे म्हणणे आगमानुकूल नसल्याने तर्कसंगत वाटत नाही.

वास्तविक मुख्य विवाद उपादानाचा आहे. त्याचा जो उचित अर्थ शास्त्रामध्ये दिला आहे, त्यावर सम्यक् दृष्टीने न पाहिल्यानेच हा वादविवाद निर्माण झाला आहे. जर आगमानुसार विशिष्ट पर्यायशक्तियुक्त द्रव्यशक्तिला अंतरंग कारण अर्थात् उपादान कारण म्हणून स्वीकारुन कार्य-कारणाची व्यवस्था केली गेली तर कोणताही वाद राहणार नाही, कारण यथार्थाने जेव्हा-जेव्हा विवक्षित कार्याच्या योग्य विशिष्ट पर्यायशक्ति ने युक्त द्रव्यशक्ति असते, तेव्हा-तेव्हा त्या कार्याला अनुकूल निमित्त आढळतातच – असा नियम आहे आणि असे होणारच नाही की, निश्चय उपादान आहे आणि निमित्त मिळणारच नाही.

ह्याच गोष्टीला असद्भूत व्यवहारनयाच्या अपेक्षेने असे म्हटले जाते की जेव्हा जसे निमित्त मिळते तेव्हा तसे कार्य होते."[१]

एक गोष्ट अशीपण आहे की, ज्याप्रमाणे त्रिकाली उपादान सदा विद्यमान असते त्याप्रकारे सामान्यतः निमित्त देखील सदैव उपस्थित असते. कारण ज्याप्रमाणे प्रत्येक द्रव्य स्वतःच्या कार्याकरिता उपादान आहे, त्याप्रमाणे प्रत्येक द्रव्य परद्रव्याच्या कार्याकरिता निमित्त देखील आहे. धर्मद्रव्यरूप निमित्त सदा विद्यमान आहे, तर काय ह्याच्या आधारे जीव आणि पुद्गलांना निरंतर चालले पाहिजे ? तशाच प्रकारे अधर्म द्रव्य देखील सदा विद्यमान आहे, तर काय जीव आणि पुद्गलांना निरंतर स्थित राहिले पाहिजे ? परंतु हे कसे शक्य आहे कारण गमन आणि स्थित राहण्याकरिता लागणाऱ्या निमित्ताची उपस्थिती सदैव असल्याने जीव आणि पुद्गल चालतील की थांबतील? परस्पर विरुद्ध स्वभाववाले असल्याने चालणे आणि थांबणे दोन्ही क्रिया एका वेळी तर शक्य नाहीत. म्हणून अगदी

१. जयपूर (खानियाँ) तत्त्वचर्चा, पुस्तक २, पृष्ठ ३८३-३८५

सहजतेने तर हेच सिद्ध होते की, सर्व जीव आणि पुद्‌गल आपल्या क्षणिक उपादानगत योग्यतेनुसार चालतात आणि थांबतात; आणि जेव्हा-जेव्हा ते आपल्या योग्यतेनुसार चालतात व थांबतात तेव्हा-तेव्हा धर्मद्रव्य आणि अधर्मद्रव्य निमित्तमात्र असतात.

अशाप्रकारे नियामक कारण तर उपादानगत योग्यतारूप क्षणिक उपादानच ठरले; ना तर त्रिकाली उपादानकारणच नियामक कारण आहे आणि ना तर निमित्तच.

इथे एक प्रश्न असाही उद्‌भवू शकतो की, धर्म आणि अधर्म तर उदासीन निमित्त आहेत, ह्याकरिता ते कदाचित नियामक कारण नसतीलही. परंतु प्रेरक निमित्ताच्या बाबतीत तर असे असता कामा नये. म्हणून उदासीन निमित्त भले काहीही करत नाहीत परंतु प्रेरक निमित्त तर सर्व काही करतात! विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये अध्यापक, पुस्तक, दिवा - तिघेही निमित्त आहेत; परंतु अध्यापक प्रेरक निमित्त आहे आणि पुस्तक आणि दिवा उदासीन निमित्त आहेत. दिव्याला आणि पुस्तकाला भले तुम्ही कर्ता म्हणू नका, परंतु अध्यापकाला तर कर्ता म्हणावेच लागेल. तो तर सक्रीय होऊन प्रेरणा देतो, समजावतो; तरीदेखील जर विद्यार्थी अध्ययनात प्रवृत्त झाले नाहीत तर त्यांना तो शिक्षा देखील करतो. म्हणून दिवा आणि पुस्तक ह्यांच्यापेक्षा अध्यापकाचे स्थान अधिक महत्त्वपूर्ण आहे.

का नाही? ही गोष्ट तर सुस्पष्ट आहे की दिवा आणि पुस्तकाच्या अपेक्षेने अध्यापकाचा निमित्तपणा भिन्न प्रकारचा आहे. ह्या गोष्टीच्या स्पष्टीकरणाकरिताच तर निमित्ताचे उदासीन आणि प्रेरक असे दोन भेद केले गेले आहेत आणि सांगितले गेले आहे की, विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये पुस्तक आणि दिवा उदासीन निमित्त आहेत आणि अध्यापक प्रेरक निमित्त.

वरील विश्लेषणामध्ये तर उदासीन आणि प्रेरक निमित्तांमध्ये परस्पर काय अंतर आहे हेच फक्त स्पष्ट होते, कार्योत्पत्तिमध्ये निमित्ताचे कर्तृत्व सिद्ध होत नाही.

उक्त संदर्भामध्ये 'इष्टोपदेशा'चे खालील कथन पाहण्याजोगे आहे :-

**''नाज्ञो विज्ञत्वमायाति, विज्ञो नाज्ञत्वमृच्छति।**
**निमित्तमात्रमन्यस्तु, गतेधर्मास्तिकायवत्॥[१]**

अज्ञाला उपदेशादि निमित्ताद्वारे विज्ञ केले जाऊ शकत नाही आणि ना विज्ञाला अज्ञ ही करुं शकतो; कारण परपदार्थ तर निमित्तमात्र आहेत. जसे की, स्वयं चालणाऱ्या जीव आणि पुद्गलांना धर्मास्तिकाय असते.''

ह्याचे स्पष्टीकरण करताना संस्कृत टीकेमध्ये लिहिले आहे :-

**''नन्वेवं बाह्यनिमित्तक्षेपः प्राप्नोतीत्यत्राह। अन्य पुनर्गुरुविपक्षादिः प्रकृतार्थ समुत्पादभ्रंशयो निमित्तमात्रं स्यात्तत्र योग्यताया एव साक्षात्साधकत्वात्।[२]**

इथे एक अशी शंका येऊ शकते की, अशात्ऱ्हेने तर बाह्यनिमित्तांचे निराकरणच होऊन जाईल. ह्याचे उत्तर असे की, अन्य जे गुरु आदि किंवा शत्रु आदि आहेत, ते प्रकृत कार्याच्या उत्पादनामध्ये किंवा विध्वंसनामध्ये केवळ निमित्तमात्र आहेत. वास्तविक कोणतेही कार्य होण्यामध्ये किंवा बिघडण्यामध्ये त्याची योग्यताच साक्षात् साधक असते.''

उक्त कथनामध्ये ही गोष्ट एकदम स्पष्ट आहे की, कार्याच्या प्रति साधकतम तर तत्समयाची योग्यतारूप क्षणिक उपादान कारणच आहे आणि ना तर त्रिकाली उपादानच नियामक आहे आणि ना तर निमित्तच.

प्रेरक आणि उदासीन निमित्तामध्ये मूलभूत अंतर अशाप्रकारे आहे - इच्छाशक्तिरहित व निष्क्रिय द्रव्य उदासीन निमित्त असतात आणि इच्छावान व क्रियावान द्रव्य प्रेरक निमित्त म्हटले जातात. धर्मद्रव्य स्वयं चालणाऱ्या जीव आणि पुद्गलांना गतिमध्ये निमित्त असते. आणि अधर्मद्रव्य गमनपूर्वक थांबणाऱ्या जीव आणि पुद्गलांच्या स्थितिमध्ये निमित्त असते. आकाश द्रव्य

---

१. आचार्य पूज्यपाद : इष्टोपदेश श्लोक-३५

२. पं. आशाधरजी : इष्टोपदेश श्लोक-३५ ची संस्कृत टीका

सर्व द्रव्यांना अवगाहनामध्ये निमित्त आहे, आणि कालद्रव्य सर्व द्रव्यांच्या परिणमनामध्ये निमित्त असते.

धर्म, अधर्म, आकाश आणि काल ही चारही द्रव्ये इच्छाशक्तिने रहित आणि निष्क्रियसुद्धा आहेत; म्हणून हे उदासीन निमित्त म्हटले जातात.

विद्यार्थ्यांना शिकविणारे अध्यापक इच्छावान असल्याने प्रेरक निमित्त म्हटले जातात आणि झेंड्याला फडफडविण्यामध्ये हवा सक्रिय असल्याने प्रेरक निमित्त म्हटली जाते.

धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य आणि कालद्रव्य इच्छाशक्तिरहित आणि निष्क्रिय असल्याने उदासीन निमित्त म्हटले जातात. तसेच जीवद्रव्य इच्छावान आणि क्रियावान असल्याने तसेच पुद्‌गल क्रियावान असल्याने प्रेरक निमित्त म्हटले जातात, तथापि कार्योत्पत्तिमध्ये सर्व निमित्त धर्मास्तिकाय समान उदासीनच आहेत.

**प्रश्न :-** विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये अध्यापकाचा उपयोगीपणा नाकारणे योग्य होणार नाही. अहो देशनालब्धिविना तर कोणास सम्यक्त्वाची प्राप्तिदेखील शक्य नाही. चारणऋद्धिधारी मुनीराजांचा उपदेश मिळाल्यानेच तर भगवान महावीराच्या जीवाने सिंहाच्या पर्यायीमध्ये सम्यग्दर्शनाची प्राप्ति केली होती. त्याचाच परिणाम असा आहे की तो जीव पुढे भगवान महावीर बनला. तर मग आपण उपदेशरूप निमित्ताचा निषेध का करता?

**उत्तर :-** उपदेशरूप निमित्ताचा निषेध कोण करतोय? निमित्ताच्या कर्तृत्त्वाचा निषेध अवश्य केला जातो. ज्याप्रमाणे अध्यापकाशिवाय विद्यार्थ्यांचे अध्ययन शक्य नाहीत्याप्रमाणे तर दिवा आणि पुस्तकाशिवाय देखील अध्ययन शक्य नाही. विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये अध्यापक, दिवा आणि पुस्तक ह्या सर्वांचीच उपयोगिता आहे. जर असे नसेल तर दिवे का जाळले जातात? पुस्तके का लिहिली जातात? आणि विश्वविद्यालयांची स्थापना देखील का होते? साधुंमध्ये देखील उपाध्यायपद का असते?

जर निमित्तांचा निषेध केला गेला तर वरील प्रश्न अवश्य उभा राहिला असता, परंतु निमित्तांच्या सत्तेचा कोण निषेध करीत आहे? परंतु ही देखील विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, नुसत्या उपदेशानेच जर आत्महित होत असेल तर उपदेश तर अनेक जीव ऐकतात, सर्वांचेच हित का होत नाही? एखाद्या वर्गात अनेक विद्यार्थी शिकत असतात. त्यांना शिकविणारा शिक्षक (अध्यापक) ही एक, पुस्तकेही तीच, दिवेसुद्धा तेच, तरी देखील सगळे विद्वान तर बनत नाहीत? सगळे आपापल्या योग्यतेनुसार विद्वान बनतात. त्याचप्रमाणे एकाच समवशरणामध्ये एकावेळी अनेक जीव धर्मोपदेश ऐकतात, तरी देखील सगळे सम्यग्दृष्टी, व्रती किंवा साधू तर बनत नाहीत. सगळे आपापल्या पर्यायगत योग्यतेनुसारच परिणमित होतात, म्हणून हे अगदी सुनिश्चितच आहे की, कार्याच्या प्रति नियामक कारण तर आपापली पर्यागत योग्यताच आहे.

जरा विचार तर करा की भगवान महावीराच्या जीवाचे हित मारिचीच्या भवामध्येच का नाही झाले? काय तेथे सद्‌निमित्तांची कमतरता होती? पिता चक्रवर्ती भरत, धर्मचक्राचे आदि प्रवर्तक भगवान ऋषभदेव आजोबा! भगवान ऋषभदेवाच्या समवशरणामध्ये त्यांचा उपदेश ऐकून तर त्यांनी विरोधभाव उत्पन्न केला होता, काय त्यांच्या उपदेशामध्ये काही कमतरता होती? काय चारणऋद्धिधारी मुनींचा उपदेश त्यांच्यापेक्षा अधिक चांगला होता? ह्यावरून सिद्ध होते की, जेव्हा पर्यायगत उपादानाची तयारी असते तेव्हा कार्य होते आणि त्यासमयी योग्य निमित्तदेखील असतेच, त्याला हुडकत जावे लागत नाही. क्रूर सिंहाच्या पर्यायामध्ये, घोर जंगलामध्ये उपदेशाची कोठे संभावना होती ? परंतु त्याचा पुरुषार्थ जागृत झाला, तेव्हा निमित्त तर आकाशातून खाली आले. एवढ्याचसाठी म्हटले जाते की, आत्मार्थींनी निमित्त हुडकण्यामध्ये काळ व्यर्थ घालवू नये. 'निमित्त नसते' असे कोण म्हणते? परंतु निमित्तांना हुडकावे लागत नाही. जेव्हा उपादानामध्ये कार्य होते तेव्हा तदनुकूल निमित्त असतेच.

निमित्तानुसार कार्य होत नाही, कार्याच्या अनुसार निमित्त म्हटले जाते. वेश्येच्या मृत शरीराकडे पाहून रागीला राग आणि वैरागीला वैराग्य उत्पन्न होते आणि ती वेश्या रागीच्या रागाचे आणि वैरागीच्या वैराग्याचे निमित्त म्हटली जाते. जर निमित्तानुसार कार्य होत असते तर तिला पाहून प्रत्येकाला रागच उत्पन्न झाला पाहिजे किंवा वैराग्यच.

आचार्यकल्प पण्डित टोडरमलजी सांगतात की, "परद्रव्य काही जबरदस्तीने बिघडवीत नाही, आपले भाव बिघडले की, तेच बाह्यनिमित्त होतात. तसेच आपले निमित्ताविनादेखील भाव बिघडतात, ह्याकरिता नियमरुपाने निमित्तदेखील नाही अशा प्रकारे परद्रव्याचा दोष पाहणे मिथ्याभाव आहे."[१]

न तर निमित्त उपादानामध्ये बळजबरीने काही करते आणि न उपादान एखाद्या निमित्तांना बळजबरीने आणतो किंवा मिळवितो. दोघांचा सहजच संबंध होतो. निमित्त-नैमित्तिक संबंधाचा सहजपणा पं. टोडरमलजींनी अशा प्रकारे स्पष्ट केला आहे :-

"जर कर्म स्वतः कर्ता होऊन उद्यमपूर्वक जीवाच्या स्वभावाचा घात करेल, बाह्य सामुग्रीला प्राप्त करेल, मग तर कर्माला चेतनपणादेखील पाहिजे आणि बलवानपणादेखील पाहिजे. असे तर नाही, तो सहजच निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. जेव्हा त्या कर्मांचा उदयकाळ असेल, त्या समयी स्वतः आत्माच स्वभावरूप परिणमन करीत नाही, विभावरूप परिणमन करतो. तसेच जी अन्य द्रव्यें आहेत, ती तशीच संबंधरूप होऊन परिणमित होतात.

ज्याप्रमाणे सूर्योदयाच्या वेळी चकवा-चकवींचा संयोग होतो. तेथे रात्री कोणी द्वेषबुद्धिने बळजबरीने त्यांना वेगळे केलेले नसते. दिवसा कोणी करुणाबुद्धिने त्यांना आणून एकत्र केलेले नसते. सूर्यास्ताचे निमित्त मिळाल्याने ते स्वतःच दुरावतात आणि सूर्योदयाचे निमित्त मिळाल्याने ते स्वतःच भेटतात. असाच निमित्त-नैमित्तिक संबंध बनत आहे. त्याचप्रमाणे कर्माचा देखील निमित्त-नैमित्तिक भाव जाणावा."[२]

---

१. मोक्षमार्ग प्रकाशक, पृष्ठ २४४

२. मोक्षमार्ग प्रकाशक, पृष्ठ २५

निमित्त-नैमित्तिक संबंध एक सहज संबंध आहे, त्याला कर्ता-कर्म संबंधरुपामध्ये प्रस्तुत करणे योग्य नाही पराबरोबर कारकतेच्या संबंधाचा निषेध करताना आचार्य अमृतचंद्र लिहितात -

**"अतो न निश्चयतः परेण सहात्मनः कारकत्वसंबंधोऽस्ति, यतः शुद्धात्मस्वभावलाभाय सामग्रीमार्गणव्यग्रतया परतंत्रैर्भूयते।**

म्हणून निश्चयाने पराबरोबर आत्म्याच्या कारकतेचा कोणताही संबंध नाही, तथापि शुद्धात्मलाभाच्या प्राप्तिकरिता जीव न जाणो का व्यग्रतापूर्वक परतंत्र (पराधीन) होतात."[१]

ह्याच गोष्टीला स्पष्ट करताना गाथेच्या भावार्थामध्ये लिहिले आहे:-

"उपरोक्त प्रकाराने द्रव्य स्वतःच आपल्या अनंतशक्तिरूप संपदेने परिपूर्ण आहे. म्हणून स्वतःच षट्कारकरूप होऊन आपले कार्य करण्यास समर्थ आहे. त्याला बाह्यसामुग्री कोणतेच सहाय्य करु शकत नाही. म्हणून केवलज्ञानाच्या इच्छुक आत्म्याने बाह्यसामुग्रीची अपेक्षा ठेवून परतंत्र होणे निरर्थक आहे."

स्वभावभावामध्ये तर पराचे कर्तृत्त्व नाही; विभावभावामध्ये देखील पराच्या कर्तृत्त्वाचा निषेध केलेला आहे पंचास्तिकाय संग्रह गाथा ६२ च्या आचार्य अमृतचंद्रकृत समयव्याख्या नामक टीकेमध्ये त्या गोष्टीला चांगल्या तऱ्हेने स्पष्ट केलेले आहे. टीकेच्या भावाला स्पष्ट करताना भावार्थामध्ये लिहिलेले मूळ कथन अशाप्रकारे आहे. :-

"अशाप्रकारे पुद्‌गलाच्या कर्मोदयादिरुपाने किंवा कर्म बंधादिरुपाने परिणमित होण्याच्या क्रियेमध्ये वास्तविक पुद्‌गलच स्वयमेव षट्कारकरुपाने प्रवर्तते म्हणून त्याला अन्य कारकांची अपेक्षा नाही. तसेच जीवाच्या औदयिकादिभावरूपाने परिणमित होण्याच्या क्रियेमध्ये वास्तविक जीव स्वतःच षट्कारकरुपाने प्रवर्तते; म्हणून त्याला अन्य कारकांची अपेक्षा नाही. पुद्‌गलाच्या आणि जीवाच्या उपरोक्त क्रिया एकाच काळामध्ये प्रवर्ततात, तथापि पौद्‌गलिक

---

१. प्रवचनसार गाथा १६ची तत्त्वप्रदीपिका टीका - पृष्ठ २७-२८

क्रियेमध्ये प्रवर्तणारे पुद्गलाचे षट्कारक जीवकारकापासून बिलकुल भिन्न आणि निरपेक्ष आहेत तसेच जीवभावरूप क्रियेमध्ये प्रवर्तणारे जीवाचे षट्कारक पुद्गलकारकांपासून बिलकुल भिन्न आणि निरपेक्ष आहेत. वास्तविक कोणात्याही द्रव्याच्या कारकांना अन्य द्रव्याच्या कारकांची अपेक्षा नसते.''

उक्त कथनाने हे अत्यंत स्पष्ट आहे की, हा भगवान आत्मा आपल्या सम्यग्दर्शन-ज्ञान चारित्ररूप निर्मलपर्यायी आणि रागादिरूप विकारी पर्यायींच्या रुपामध्ये आपापल्या स्वसमयाच्या योग्यतेनुसार स्वतःच परिणमित होतो, त्यामध्ये पराचा (निमित्ताचा) कोणताच हस्तक्षेप नाही.

होय, हे अवश्य आहे की जेव्हा हा आत्मा सम्यग्दर्शनादि निर्मलपर्याय किंवा रागादि विकारीपर्यायांच्या रुपामध्ये आपल्या स्वभावगत आणि पर्यायगत योग्यतेनुसार परिणमित होतो, तेव्हा तदनुकूल निमित्त देखील असतातच. म्हणून हे कथनदेखील असत्य नाही की, निमित्ताशिवाय कार्य होत नाही; परंतु हे कथन फक्त निमित्ताची अनिवार्य उपस्थितीच दर्शविते, ह्यापेक्षा अधिक काही नाही.

निमित्ताच्या केवळ अनिवार्य उपस्थितीने त्याला कर्ता किंवा साधकतम करण मानले जाऊ शकत नाही.

निमित्त सदैव परपदार्थरुपच असते. जे खालील कथनावरुन अधिक स्पष्ट होते :-

**''उपादान निजगुण जहाँ, तहाँ निमित्त पर होय।''**[१]

निमित्ताला कर्ता किंवा साधकतम करण मानल्याने एका द्रव्याचा कर्ता दुसऱ्याला मानल्याने द्रव्याच्या स्वतंत्र सत्तेचा नाश होतो.

उक्त संदर्भामध्ये जैनतत्त्वमीमांसाचे खालील कथन पाहण्यासारखे आहे.

''जर केवळ बाह्य निमित्तानुसार वस्तुंच्या प्रत्येक पर्यायाची उत्पत्ति मानली गेली तर प्रत्येक वस्तुला स्वरूपानेच पराधीन मानण्याचा प्रसंग उद्भवतो आणि अशा अवस्थेमध्ये जीवांची स्वाश्रित बंध-मोक्ष व्यवस्था, परमाणु, धर्मादि चार

१. पं. बनारसीदास : उपादान-निमित्त दोहा, दोहा-४

द्रव्याच्या स्वभावपर्याय तसेच अभव्य आणि दूरानुदूर भव्याचे निरंतर संसारी बनून राहणे शक्य होणार नाही.

म्हणून प्रत्येक द्रव्यामध्ये त्याच्या आपआपल्या स्वभावादिच्या कारणरूप अशी व्यवस्था असली पाहिजे, ज्यामुळे प्रत्येक समयाचा उत्पाद-व्यय स्वयं होतो. प्रत्येक समयाचे पृथक्-पृथक् जे वस्तुनिष्ठ कारण आहेत, त्यांचेच आगमामध्ये निश्चय उपादान हे नाव स्वीकारलेले आहे.

ह्यावरुन हे स्पष्ट होते की प्रत्येक समयाच्या प्रत्येक कार्याचे निश्चय उपादान सुनिश्चित आहे. ह्या सुनिश्चित व्यवस्थेचा आपल्या इंद्रिय प्रत्यक्ष, तर्क आणि अनुभवाच्या आधारे अपलाप (अदला बदल) करणे, एका द्रव्याश्रित कार्य-कारणभावालाच मातीमोल ठरविण्यासारखे आहे. मी तर ह्याला आगमाची अवहेलना करण्यासारखा सर्वात मोठा अपराध मानतो.''[१]

प्रत्येक द्रव्य स्वभावानेच परिणमनशील आहे. जेव्हा नित्य राहूनदेखील निरंतर परिणमित होणे प्रत्येक द्रव्याचा स्वभाव आहे तर मग त्याला आपल्या परिणमनामध्ये परद्रव्याची अपेक्षाच का? कारण स्वभाव तर निरपेक्षच असतो. जो पराची अपेक्षा ठेवतो त्याला स्वभाव कसे मानले जाऊ शकते?

निमित्तांना अंतरंग-निमित्त आणि बहिरंग निमित्ताच्या रुपानेदेखील वर्गीकृत केले जाते. मुख्य निमित्ताला अंतरंग निमित्त आणि गौण निमित्ताला बहिरंग निमित्त म्हटले जाते. कर्मबंधनामध्ये आत्म्याच्या रागादिभावाला अंतरंग निमित्त आणि मन-वचन-कायाच्या व्यापाराला बहिरंग निमित्त म्हटले जाते. अशाप्रकारे पदार्थांच्या ज्ञानामध्ये ज्ञानावरणी कर्माच्या क्षयोपशमाला अंतरंग निमित्त आणि इंद्रिय प्रकाश वगैरेंना बहिरंग निमित्त म्हटले जाते. सम्यग्दर्शनाच्या प्राप्तिमध्ये दर्शनमोहनीय कर्माचा क्षय, क्षयोपशम, उपशमाला अंतरंग निमित्त आणि गुरुउपदेशाला बहिरंग निमित्त म्हणतात.

निमित्त भले अंतरंग असो किंवा बहिरंग, परंतु आहे तर ते निमित्तच, कार्याच्या उत्पत्तिमध्ये सर्व निमित्तांची स्थिति जवळजवळ एकसारखीच आहे; म्हणून कोणतेही निमित्त कर्ता किंवा साधकतमकरण होऊ शकत नाही. यद्यपि

१. जैनतत्त्वमीमांसा, पृष्ठ - ७१

आत्म्याचे रागादिभाव आणि कर्मांचा उदय, क्षय, क्षयोपशम तसेच उपशमाला अंतरंग निमित्तरुपानेच निरुपित केले जाते. तरी यांच्या संदर्भामध्ये आचार्य अमृतचंद्राचे खालील कथन पाहण्याजोगे आहे :-

**"जीवकृतं परिणामं निमित्तमात्रं प्रपद्य पुनरन्ये।**
**स्वयमेव परिणमन्तेऽत्र पुद्गलाः कर्म भावेन॥**
**परिणममानस्य चितश्चिदात्मकैः स्वयमपि स्वकैर्भावैः**
**भवति हि निमित्तमात्रं पौदगलिकं कर्म तस्यापि ॥**[१]

जीवकृतरागादि परिणामांचे केवळ निमित्त मिळाल्याने जीवाहून भिन्न अन्य पुद्गलस्कंध स्वतःच ज्ञानावरणादि कर्मरुपाने परिणमित होतात. अशाप्रकारे रागादिभावरूप स्वतःच परिणमित होणाऱ्या आत्म्याला पुद्गलकर्माचा उदय केवळ निमित्तमात्रच आहे."[१]

उक्त संदर्भामध्ये खालील कथनदेखील पाहण्यासारखे आहे -

"वास्तविक असे समजले पाहिजे की ज्याला आगमामध्ये निमित्त म्हटलेले आहे, तो दुसऱ्याला कार्याच्या उत्पत्तिमध्ये परमार्थाने कणभरदेखील सहाय्य करीत नाही, तरी देखील त्याच्या सहाय्या शिवाय कार्य होऊ शकत नाही - असे मानणेच अध्यवसानभाव आहे. ह्याचाच प्रत्येक वस्तु आपल्या कार्यसमयी स्वयं निषेध करते, कारण जेवढ्या जड-चेतन वस्तु (द्रव्यें) आहेत, त्यांचा परिणाम (कार्य) पराच्या अपेक्षाविना स्वतःच होतो. तरीदेखील भिन्न सत्तेच्या दोन द्रव्यांमध्ये जे विशेषण-विशेष्यभाव निमित्त-नैमित्तिक आणि आधार-आधेय संबंध मानलेले आहेत, ते फक्त असद्भूत व्यवहारनयानेच मानलेले आहेत. परमार्थाने त्यांच्यामध्ये कोणताच संबंध नाही.

म्हणून जेथे-जेथे आगमामध्ये असे म्हटलेले आहे की क्रोध नामक चारित्रमोहनीय कर्माच्या उदयाने जीवामध्ये क्रोधाची उत्पत्ति होते, तर तेथे त्याला काल-प्रत्यासत्तिवश (काळाच्या जवळीकीमुळे) केले गेलेले उपचरित कथनच जाणले पाहिजे. अर्थात् त्यावेळी चारित्रमोहनीय कर्माच्या उदयाने निरपेक्ष होऊन

---

१. आचार्य अमृतचन्द्र : पुरुषार्थसिद्ध्युपाय, श्लोक - १२-१३

क्रोध नामक चारित्रमोहनीय परिणाम स्वयमेव उत्पन्न झाला. न तर उक्त कर्म क्रोधाच्या उत्पत्तिमध्ये परमार्थाने सहाय्यक झाला आणि न उक्त क्रोधभावदेखील उक्त कर्माच्या उदयामध्ये परमार्थाने सहाय्यक झाला. दोघांनी एकमेकाची अपेक्षा केल्याशिवायच आपापले परिणाम केले. तरीदेखील काल-प्रत्यासत्तिवश विशेष प्रयोजनाला लक्षात ठेवून हा असद्‌भूत व्यवहार केला जातो की क्रोध कर्माच्या उदयाने क्रोधभाव झाला आहे.''[१]

आशय हा आहे की उपादानामध्ये कार्यरूप परिणमनाची योगयता असल्याने तो स्वत: कार्यरूप परिणमतो आणि बाह्यसामुग्री त्यामध्ये त्याचवेळी निमित्त असते. कारण निमित्तपणाला प्राप्त झालेली बाह्यसामुग्री आणि उपादानभूत द्रव्याच्या कार्यामध्ये नियमाने बाह्यव्याप्ति असते, ह्यालाच काल-प्रत्यासत्ति असे म्हणतात.

जर बाह्यसामुग्रीमध्ये कारणपणा भूतार्थ मानला गेला तर ज्याप्रमाणे पोपट आपल्या स्वत:च्या सहज योग्यतेवश बाह्यसामुग्रीच्या सद्‌भावामध्ये शिकू लागतो, त्याचप्रमाणे सहज योग्यतेच्या अभावामध्येदेखील बाह्यसामुग्रीच्या जोरावर बगळ्याने सुद्धा शिकले पाहिजे; परंतु लाखो प्रयत्न करुनसुद्धा बाह्यनिमित्तांच्या जोरावर बगळा शिकू शकत नाही आणि पोपट शिकतो. ह्यावरुन हे लक्षात येते की, बाह्यसामुग्री तर कार्यामध्ये निमित्तमात्र आहे, जे काही कार्य होते ते द्रव्यामधील पर्यायगत योग्यता प्राप्त झाल्यानेच होते.

ह्यामुळेच भट्टाकलंकदेवाने दैवाचे लक्षण सांगताना आपल्या अष्टशती टीकेमध्ये लिहिले आहे की, **'पुराकृतं कर्म योग्यता च दैवम्'** अथात् पूर्वी केलेली कर्म आणि योग्यता ह्या दोघांना दैव असे म्हणतात.

पहा, १४ व्या गुणस्थानामध्ये असातावेदनीयाचा उदय तर आहे, परंतु तज्जन्य दु:ख आणि त्याचे वेदन नाही; कारण त्या काळी त्या जीवामध्ये द्रव्य-पर्याय योग्यतेचा अभाव झाला आहे. ह्यावरुन सिद्धांत हा निघतो की, बाह्यसामुग्रीचा सद्‌भाव किंवा क्रियाशीलता कार्याचे नियंत्रक (नियामक)

१. जैनतत्त्वसमीक्षाचे समाधान, पृष्ठ ५६

असत नाहीत. उपादानगत द्रव्य-पर्याय योग्यताच कार्याची नियंत्रक असते, कारण अशा उपादानाच्या अनन्तर समयामध्ये नियमाने कार्याची उत्पत्ति दिसून येते.[१]

"ह्यासाठी निष्कर्षरुपामध्ये हे समजले पाहिजे की, प्रत्येक द्रव्य नित्यतेबरोबर स्वयं परिणामस्वभावी असल्याने आपले कार्य स्वतःच करते - हे यथार्थ आहे. कार्याच्या होण्यामध्ये जो निमित्तपणा स्वीकारला गेला आहे, तो असद्भूत व्यवहारनयानेच स्वीकारला गेला आहे, परमार्थाने नाही.

म्हणून निश्चयनयाचे कथन सम्यक् एकांतरुप असूनसुद्धा त्याद्वारे अनेकांताचीच प्रतिष्ठा होते. वास्तविक असद्भूत व्यवहारनयाच्या कथनानुसार पराचे सहाय्य यथार्थ मानल्याने परमार्थाने ते अनेकांताचे घातकच सिद्ध होते."[२]

उपर्युक्त संपूर्ण विवेचनाने 'कार्योत्पत्तिमध्ये उपादान आणि निमित्ताचे काय स्थान आहे' - ही गोष्ट अत्यन्त स्पष्ट होते. पक्षव्यामोहापासून दूर राहून विचार केल्याने वादविवादाला कोणती च जागा उरत नाही. जिनवाणीचे सखोल अध्ययन न करणेच तात्त्विक वादविवादाचे मूळ कारण आहे. म्हणून तात्त्विक वादविवादापासून वाचण्याकरिता एकमेव उपाय जिनवाणीचा सखोल स्वाध्याय करणेच आहे. न केवळ तात्त्विक वादविवाद मिटविण्याकरिता, परंतु आत्मकल्याणाकरितादेखील प्राथमिक अवस्थेमध्ये जिनवाणीच परमशरण आहे.

आगम आणि परमागमाच्या प्रकाशामध्ये केल्या गेलेल्या उक्त अनुशीलनामध्ये निमित्त-उपादानाचे स्वरूप यद्यपि खूपसे स्पष्ट झाले आहे, तथापि काही प्रश्न आत्मार्थिचे मन क्षुब्ध बनवून टाकतातच. त्या प्रश्नांची यथासंभव उत्तरंदेखील आगम आणि परमागमाच्या प्रकाशाद्वारे दिली गेली तर ते असंगत ठरणार नाही.

असा विचार करुनच आगामी प्रश्नोत्तर खंडामध्ये कित्येक महत्त्वपूर्ण प्रश्नांच्या संदर्भामध्ये ऊहापोह अपेक्षित आहे.

• • •

---

१. जैनतत्त्व समीक्षाचे समाधान, पृष्ठ १०८

२. जैनतत्त्व समीक्षाचे समाधान, पृष्ठ १२७

# निमित्तोपादान : काही प्रश्नोत्तरे

**प्रश्न १** – ज्याप्रमाणे जोपर्यंत पुत्र होत नाही, तोर्यंत कोणाला पिता म्हणणे संभवत नाही; त्याप्रमाणे जोपर्यंत कार्य होत नाही, तोपर्यंत कोणालाही कारण म्हणणे सुद्धा संभवत नाही; कारण कार्याविना कारण कोणाचे? पुत्राविना पिता कोणाचा ?

अशा परिस्थितीमध्ये विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे की, सम्यग्दर्शनरुप कार्य तर करणलब्धिच्या अंतिम समयी होते आणि देशनालब्धिरूप कारण त्यापेक्षा खूप अगोदर होते. कमीत कमी अंतर्मुहूर्त अगोदर तर होतेच होते, अधिकात अधिक तर भवपरिवर्तन देखील होऊ शकतो, कारण असेदेखील होते की, देशना पूर्वभवामध्ये प्राप्त झालेली असेल आणि सम्यग्दर्शन उत्तरभवामध्ये उत्पन्न होईल. अशा सम्यग्दर्शनालाच निसर्गज सम्यग्दर्शन म्हणतात.

उक्त परिस्थितीमध्ये प्रश्न हा आहे की, जर कार्य झाल्यानंतर एखाद्याला कारण मानले गेले तर मग सम्यग्दर्शनरूप कार्याचे निमित्तकारण देशनालब्धिला किंवा गुरुपदेशाला कसे म्हटले जाऊ शकते ?

**उत्तर :**- जरी हे सत्य आहे की कार्याविना कोणाला कारण म्हणणे संभवित नाही, पुत्राविना कोणाला पिता म्हणता येत नाही; तथापि कार्याच्या पूर्वी कारणाची सत्ता तर नाकारता येत नाही. कारण पुत्र होण्यापूर्वी पित्याची सत्ता तर होतीच, भले त्याला पिता म्हणणे शक्य नव्हते.

उपदेशाला निमित्तकारणदेखील तेव्हाच म्हटले जाईल, जेव्हा त्या उपदेशाने एखाद्याला सम्यग्दर्शनाची प्राप्ती होईल. कारण त्या सम्यग्दर्शनरुप कार्याचेच तर ते कारण म्हटले जाईल. जर कोणालाही सम्यग्दर्शनाची प्राप्तीच झाली नाही तर त्या उपदेशाला कशाचे कारण म्हटले जाईल ?

हे सर्व होऊन देखील जेव्हा एखाद्याला सम्यग्दर्शनाची प्राप्ती होते; तेव्हा उपदेशाचे प्राप्तीरुप निमित्त नियमाने त्याच्या पूर्वीच असते, त्या समयी नाही. ह्यावरुनच सिद्ध होते की, उपदेशरुप निमित्तकारण तर कार्य होण्यापूर्वीच असते त्या समयी नाही, जरी तुम्ही त्याला कारण तेव्हा म्हणा जेव्हा ते कार्य होईल.

येथे ही गोष्ट देखील ध्यान देण्यायोग्य आहे की अन्य कार्यासमान सम्यग्दर्शनरूप कार्याची निमित्तंदेखील दोन प्रकारची आहेत. अंतरंग आणि बहिरंग. अंतरंग निमित्त तर दर्शनमोहनीय कर्माचा क्षय, क्षयोपशम किंवा उपशमरूप भाव आहे आणि बहिरंग निमित्त आहे उपदेशाची प्राप्ती. अंतरंग निमित्त तर कार्योत्पत्तिच्या काळामध्येच विद्यमान आहे; परंतु देशनालब्धिरूप बाह्यनिमित्त अगोदरच झाले आहे. असा कोणता नियम नाही की ज्याच्या अनुसार अंतरंग आणि बहिरंग दोन्ही निमित्तकारणांचे कार्योत्पत्तिकाळामध्ये उपस्थित असणे अनिवार्यच आहे.

**प्रश्न २** - जर असे आहे तर मग असे का म्हटले जाते की, उपदेशाला कारण तेव्हा म्हटले जाईल की जेव्हा सम्यग्दर्शनरुप कार्याची उत्पत्ति होईल ?

**उत्तर** - अशासाठी की असा तर कोणता नियम नाही की उपदेशश्रवणाने सम्यग्दर्शनाची प्राप्ती झालीच पाहिजे. होऊ देखील शकते आणि होऊ ही शकत नाही ह्या गोष्टीला स्पष्ट करण्याकरिता असे म्हटले जाते की, उपदेशाला कारण तेव्हा म्हटले जाईल की जेव्हा ऐकणाऱ्याला सम्यग्दर्शनाची प्राप्ती होईल.

वास्तविक गोष्ट अशी आहे की, असा नियम तर आहे की जेव्हा एखाद्याला सम्यग्दर्शनाची प्राप्ती होईल, तर तत्पूर्वी त्याला देशनालब्धीची प्राप्तीदेखील अवश्य होईल; परंतु असा नियम नाही की, देशनालब्धि मिळाल्यावर नियमाने सम्यग्दर्शन होईलच. हेच कारण आहे की देशनालब्धिरूप कारण अगोदरपासून विद्यमान असल्यावर देखील त्याचे कथन कार्योत्पत्तिनंतरच केले जाते.

**प्रश्न ३** - जर असे आहे तर मग तीर्थंकर, साधु-संत आणि ज्ञानींच्या देशनेला निमित्त-कारण म्हटले जावे की नाही ? शास्त्रांमध्ये तर ह्या सर्वांना सम्यग्दर्शनाचे निमित्तकारण म्हटलेले आहे. जिनबिंब दर्शनालादेखील सम्यग्दर्शनाचे निमित्त म्हटले गेले आहे.

**उत्तर** - सामान्यपणे तर तीर्थंकर, साधु-संत आणि ज्ञानींच्या उपदेशाला आणि जिनबिंबादिला सम्यग्दर्शनाचे निमित्त म्हटलेच जाते आणि म्हटले सुद्धा गेले पाहिजे; परंतु ते कारण आहे कोणाला ? त्यालाच ना की ज्याला सम्यग्दर्शनाची प्राप्ती झाली आहे! म्हणून जेव्हा त्याच्या निमित्ताने एखाद्या विशिष्ट व्यक्तिला सम्यग्दर्शनाची प्राप्ती होते, तेव्हा त्या सम्यग्दर्शनरुप कार्याचे कारण त्याच्या उपदेशाला म्हटले जाते. सामान्य आणि विशेष कथनामध्ये हा फरक पडतोच.

**प्रश्न ४** - जिनबिंबदर्शनाला सम्यग्दर्शनाचे निमित्त म्हटले गेले आहे, परंतु एखाद्या कामी व्यक्तिला जिनबिंबाची नग्नदशा पाहून कामभावाची उत्पत्ति झाली तर काय त्या जिनबिंबाला विकारोत्पत्तिचे निमित्तसुद्धा म्हटले जाईल ?

**उत्तर** - अरे बंधु ! मुद्दा तर असा आहे की, जिनबिंब तर मुख्यत: सम्यग्दर्शन किंवा वैराग्याचेच निमित्त असते आणि ह्याच कारणास्तव त्याची स्थापनादेखील केली जाते. तथापि एखाद्या कामी जीवाला त्यांना पाहून कामभावाची उत्पत्ति झाली तर निमित्त-उपादान मीमांसेमध्ये तर त्याला बहिरंग-निमित्त म्हटलेच जाईल. परंतु सामान्यपणे जिनबिंबाला सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राचेच निमित्त म्हटले जाते.

सामान्य कथन आणि विशेष कथनाच्या फरकाला ओळखले पाहिजे. तसे तर वेश्या विकाराचेच निमित्त मानले गेले आहे, परंतु एखाद्याला वेश्येची वृत्ती पाहून वैराग्य झाले तर काय वेश्यांना वैराग्याचे निमित्त मानून त्यांना धर्मस्थानांमध्ये स्थान दिले जाईल ?

नाही, कदापि नाही; धर्मस्थानांमध्ये तर वैराग्याच्या निमित्तरूपामध्ये वीतरागी जिनबिंबालाच स्थापित केले जाते आणि भविष्यातही केले जाईल.

**प्रश्न ५** - आपण कबूल करा अथवा करु नका, परंतु ती वेश्या वैराग्याचे निमित्त तर बनलीच. त्याचप्रमाणे ते वीतरागी नग्न दिगंबर जिनबिंब देखील विकाराचे निमित्त बनले.

**उत्तर** - त्या कार्यामध्ये त्याच्या निमित्तपणाला कोण नाकारतो ? परंतु जेव्हा सद्‌निमित्ताच्या संगतिमध्ये राहण्याची प्रेरणा दिली जाइल, तेव्हा वैराग्याकरितां ज्ञानी धर्मात्म्यांच्या संगतिमध्येच राहण्याचा उपदेश दिला जाईल, एखाद्या वेश्येच्या संगतीमध्ये राहण्याचा नाही.

मुख्यत: तर खरे देव-शास्त्र-गुरुच वैराग्यामध्ये निमित्त असतात, वेश्यादिक नव्हे. वेश्येचे वैराग्यामध्ये निमित्त बनणे तर एक अपवाद आहे. अपवादानुसार जगाचा व्यवहार चालत नाही.

ज्याच्या उपादानाची जोरदार तयारी असेल, त्याच्या करिता वेश्यादेखील वैराग्यामध्ये निमित्त बनू शकते. अशा घटनांनी वेश्यारूप निमित्ताची महिमा वाटता कामा नये; परंतु त्या उपादानाचा विशेषपणा समजला पाहिजे, क्षणिक उपादानाचा महिमा आला पाहिजे.

वास्तविक कार्य तर उपादानाच्या पर्यायगत योग्यतेनुसारच संपन्न (पूर्ण) होत असते. निमित्ताची तर फक्त अनुकूलतारुपाने उपस्थितीच असते.

निमित्तांचे कथन जिनागमामध्ये अनेक प्रकाराने प्राप्त होते. सर्वत्र त्याची अपेक्षा लक्षात आली पाहिजे, नाहीतर मनामध्ये अनेक भ्रम उभे राहू शकतात. मनामध्ये अनेक प्रकारचे भ्रम उत्पन्न होऊ नयेत, वृत्तिमध्ये चंचलता येऊ नये, ह्याकरिता निमित्त-उपादानाचे स्वरूप सखोलतेपूर्वक समजले पाहिजे.

**प्रश्न ६** - हा विषय तर फार कठीण वाटतो. हे सगळे तर विद्वानांनी पंडितांनी समजण्याचा विषय आहे. सामान्य लोकांना निमित्त-उपादानापासून काय देणे-घेणे ?

**उत्तर** - तसे तर सर्व विषय समजण्यास थोडेफार कठीण तर असतातच. कोणताही विषय का असेना, जोपर्यंत त्याच्या खोलात शिरत नाही, तोपर्यंत तो समजणार नाही. आपण तर असेच हसत-खेळत विषय समजू इच्छितो, तसे तर शक्य नाही. परंतु असे देखील नाही की आपण थोडा उपयोग सूक्ष्म करावा आणि विषय आपल्याला समजूच नये. उपयोगाला सूक्ष्म करुन रुचिपूर्वक

समजण्याचा प्रयत्न केला तर हा विषयदेखील सर्वांना अवश्य समजून येऊ शकेल.

असा विचार करणे सर्वांत मोठा अडसर आहे की हा विद्वानां पंडितां चा विषय आहे. सामान्य लोकांना ह्यापासून काय देणे-घेणे ? काय सामान्य लोकांना आपले कल्याण करायचे नाही ? जर त्यांना आपले कल्याण करावयाचे आहे तर त्यांनीदेखील हे सर्व समजलेच पाहिजे.

जर ह्याचा संबंध आत्मकल्याणाशी नसता तर मग विद्वानदेखील ह्याला समजण्यामध्ये आपला वेळ कां दवडतील? काय त्यांच्या वेळेची काही किंमत नाही, जे आपला वेळ अनावश्यक अनुपयोगी विषयाच्या डोकेदुखीमध्ये बरबाद करतील ?

आत्मकल्याण करण्याकरिता ह्या विषयाला समजणे अत्यंत आवश्यक आहे. याला समजल्याशिवाय आत्मकल्याणाचा मार्ग प्रशस्त होत नाही. करुणासागर आचार्यांनी जिनवाणीमध्ये ह्या विषयाचे विवेचन मुक्तिमार्गामध्ये अत्यंत उपयोगी जाणूनच केलेले आहे. म्हणून ह्याला समजण्यामध्ये येणाऱ्या थोड्या-फार अडचणींना बघून घाबरता कामा नये, घाबरुन ह्याला असेच टाकून देता कामा नये, ह्यापासून पराङ्मुख होता कामा नये; परंतु ह्या विषयाला अत्यंत उपयोगी समजून ह्यामध्ये पूर्ण ताकद लावली पाहिजे, वेळ खर्ची घातला पाहिजे, उपयोग लावला पाहिजे.

**प्रश्न ७** - आपणच म्हणता की जर आपले कल्याण करावयाचे असेल तर आत्म्याला जाणा, ओळखा आणि त्यामध्ये स्थिर व्हा, रममाण व्हा; कारण सुखी होण्याचा एकमेव हाच उपाय आहे. ह्यामध्ये निमित्त-उपादान समजण्याची काय आवश्यकता आहे ?

**उत्तर** - आत्म्याचे कल्याण करणे हे देखील एक कार्य आहे, आपल्याला जाणणे-ओळखणे हे देखील एक कार्य आहे, आपल्यामध्ये स्थिर होणे - रममाण होणे देखील एक कार्य आहे आणि कोणते ही कार्य कारणाशिवाय संपन्न होत नाही. निमित्त आणि उपादान हे कारणांचेच प्रकार आहेत. म्हणून आत्मकल्याण

करण्यासाठी, आपल्याला जाणण्या-ओळखण्यासाठी, आपल्यामध्ये स्थिर होण्या-रममाण होण्यासाठी, त्यांचे स्वरूप चांगल्या तऱ्हेने जाणणे अत्यंत आवश्यक आहे.

निमित्त आणि उपादानाचे खरे स्वरूप न समजल्याने आत्मकल्याणरूप कार्य करण्याकरिता देखील हा आत्मा परपदार्थांच्या सहयोगाच्या आकांक्षेने पराकडे डोकावतो; स्वत:कडे पहातदेखील नाही. म्हणून हे समजणे अत्यंत आवश्यक आहे की, आपल्या कल्याणाचे कार्य तर स्वत:च्या आश्रयाने, स्वत:च्या पात्रतेने, स्वत:मध्येच संपन्न होते; परपदार्थ तर त्यामध्ये फक्त निमित्तच असतात.

जेव्हा द्रव्यस्वभावामध्ये पर्यायगत पात्रतेचा परिपाक होतो तेव्हा निमित्तदेखील सहजपणेच उपस्थित होते. म्हणून निमित्तावरुन दृष्टि हटवून त्रिकाली उपादान, जो की निज त्रिकाली ध्रुव परमात्मा आहे; त्यावर दृष्टिला केन्द्रित करणेच आत्मानुभवाचा मार्ग आहे.

हे कार्यदेखील पर्यायगत योग्यतेच्या सद्भावामध्ये सहजभावानेच संपन्न होते, ह्याकरिता देखील आकुलित होण्याने कोणते ही कार्य होत नाही; प्रत्येक कार्य स्वसमयामध्ये स्वत:च्या योग्यतारूप उपादानकारणानेच संपन्न होते आणि जेव्हा कार्य होते तेव्हा तदनुकूल निमित्त देखील असतात. त्यांना शोधायला जावे लागत नाही.

अशाप्रकारे आत्मकल्याणरूप कार्यामध्ये निमित्त-उपादानाच्या संधीचे सम्यग्ज्ञान झाल्याने दृष्टि परपदार्थांवरुन हटून स्वभावसन्मुख होते आणि आत्मानुभूति प्रगट होते. आत्मानुभूतिच्या काळामध्ये निश्चय सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राच्या उत्पत्तिरुप मोक्षमार्ग प्रगट होतो.

**प्रश्न ८** - जेव्हा प्रत्येक कार्याच्या उत्पत्तिमध्ये उपादानाबरोबर निमित्त देखील असतेच तेव्हा त्याच्याकडे लक्ष का बरे द्यायचे नाही ? त्याचा शोध का बरे करायचा नाही ?

**उत्तर** - जेव्हा हे सुनिश्चित आहे की प्रत्येक कार्यामध्ये निमित्त असतेच तर मग त्याचा शोध लावण्याची काय गरज आहे ? प्रत्येक पदार्थ जेव्हा पर्यायगत

योग्यतेच्या कारणाने विवक्षित (ठराविक) पर्याय धारण करतो, तेव्हा त्यायोग्य निमित्तदेखील असतेच. जेव्हा भगवान महावीराचा जीव सोळाव्या स्वर्गातून निघून तीर्थंकररुपामध्ये मनुष्यभव धारण करीत होता, तेव्हा मातेच्या रुपामध्ये त्रिशला आणि पित्याच्या रुपामध्ये सिद्धार्थ सहजभावाने उपस्थितच होते.

काय महावीराच्या जीवाने त्यांचा शोध घेतला होता ? कोणतीही व्यक्ति जेव्हा मनुष्यभव धारण करते तेव्हा आई-वडिलांविना तर धारण करीत नाही; परंतु काय त्यांना आई-वडिलांचा शोध ध्यावा लागतो? काय आजपावेतो कोणीही असे केले आहे की सर्व काही सहजभावानेच चालत राहिले आहे ?

ज्याप्रमाणे आई-वडिलांच्या शोधा खेरीजच प्रत्येक मानवाला जन्मावेळी आपापल्या योग्यतेनुसार आई-वडिल उपलब्ध होतच आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक आत्मार्थीला अनुभूतीच्या वेळी किंवा पूर्वी सुयोग्य निमित्त सहजभावाने उपलब्धच होतात, त्यांना शोधण्याकरिता कोठे जावे लागत नाही.

महावीराच्या जीवाची सिंहाच्या पर्यायामध्ये जेव्हा पात्रता पक्व झाली तेव्हा निमित्तरुपामध्ये युगल मुनिराज सहजभावाने उपस्थितच होते. त्यांचा संयोग प्राप्त करण्याकरिता त्या सिंहाने कोणते प्रयत्न केले होते ? ज्ञानींच्या संपर्कामध्ये आयुष्यभर निरंतर राहणारे लोक काय सगळेच सम्यग्दर्शन प्राप्त करतात का? आम्ही तुम्ही अशा अनेक लोकांना पाहिले असेल की जे आयुष्यभर ज्ञानीच्या संपर्कामध्ये राहिले, त्यांची सेवा करीत होते, परंतु हाती काही सुद्धा लागले नाही.

**प्रश्न ९** - जर ज्ञानींच्या समागमामध्ये देखील कोणाला काही उपलब्ध झाले नाही, तर ह्याचा अर्थ असा तर नाही की आपण सत्संगती करता कामा नये?

**उत्तर** - नाही, असा अर्थ कदापि नाही. सत्समागमामध्ये राहणे तर जीवनाचे महत्भाग्य आहे; कारण सत्संगातिची रुचि न केवळ आपल्या उज्ज्वल भविष्याची सूचक आहे, परंतु वर्तमान निर्मल परिणामांनासुद्धा दाखविते. जर आपले परिणाम वर्तमानामध्येच विकृत असते तर आपण असत् लोकांच्या समागमामध्ये राहणे पसंत केले असते.

सत्समागम चांगला असूनसुद्धा सर्व काही सत्समागमानेच होणार नाही. सत्समागम तर निमित्तमात्र आहे. जोपर्यंत आपली अंतरंगाची तयारी होत नाही, उपादान योग्यतेचा परिपाक होणार नाही, दृष्टि स्वभावसन्मुख होणार नाही, तोपर्यंत आत्मकल्याणाचा मार्ग प्रशस्त होणार नाही. ह्या गोष्टीला सुद्धा चांगल्या तऱ्हेने समजून घेतले पाहिजे.

आयुष्यभर सत्समागमामध्ये राहून देखील आत्मलाभाची प्राप्ति झाली नाही. ह्याचे देखील एकमेव हेच कारण आहे की, त्यांची दृष्टि सत्समागमावरच राहिली, स्वभावसन्मुख झाली नाही. म्हणून सत्समागमामध्ये राहणे तर चांगले आहे, परंतु त्याकरितादेखील व्यग्र होण्याची आवश्यकता नाही. ज्याचे जेवढे महत्त्व आहे, आपणास तेवढ्याचा अवश्य स्वीकार करायला पाहिजे; परंतु हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की, ज्याप्रकारे सत्समागमाचे महत्त्व न स्वीकारण्यात हानि आहे, त्याहीपेक्षा अधिक हानि त्याच्या आवश्यकतेपेक्षा त्याला अधिक महत्त्व देण्यामध्ये आहे.

वास्तविक सत् तर आपला त्रिकाली ध्रुव आत्माच आहे; त्याच्या समागमामध्येच सत्चा लाभ होणारा आहे. त्याची संगतिच वास्तविक सत्संगति आहे. आपल्या श्रद्धेचा श्रद्धेय (दृष्टिचा विषय) ज्ञानाचा ज्ञेय आणि ध्यानाचा ध्येय तर त्रिकाली सत् निज भगवान आत्माच बनला पाहिजे.

त्या त्रिकाली ध्रुवरूप सत्चे स्वरूप दाखविणारे ज्ञानी धर्मात्माच सत्पुरुष म्हटले जातात. त्यांच्या संगतिला देखील सत्संगति म्हणतात. बाकी पुण्य-पापाच्या प्रपंचामध्ये अडकलेले लोक न तर सत्पुरुष आहेत आणि न त्यांची संगति सत्संगति देखील आहे.

निश्चय सत्संगति तर त्रिकाली ध्रुव भगवान आत्म्याच्या ज्ञान, श्रद्धान आणि ध्यानाचेच नाव आहे; परंतु आत्म्याचे स्वरूप दाखविणारे, आत्मानुभवाची प्रेरणा देणारे, आत्मानुभवी पुरुषाच्या संगतिला, त्यांच्या त्रिकाली भगवान आत्म्याचे स्वरूप ऐकण्याला व्यवहाराने सत्संगति म्हणतात. निव्वळ त्यांची सेवा-सुश्रुषा करणे तर व्यवहारनेदेखील सत्संगति म्हटली जाऊ शकत नाही.

म्हणून आमचे तर हेच म्हणणे आहे की, निश्चय सत्समागमाच्या उद्देशाने व्यवहार सत्समागम करणेदेखील चांगलेच आहे.

**प्रश्न १०** – काय त्रिकाली ध्रुव भगवान आत्म्याचे स्वरूप दाखविणारेच सज्जन आहेत, सत्पुरुष आहेत, बाकी सगळे सज्जन नाहीत, सत्पुरुष नाहीत? विश्वामध्ये तर हजारो महापुरुष आहेत आणि होऊन गेले आहेत की जे लोकांना दया दानाचा उपदेश देतात, परोपकाराची प्रेरणा देतात, येथवर की, त्यांनी जगाच्या लोकांच्या सुखसोयीसाठी आपले पूर्ण जीवनच समर्पित केले आहे. काय ते सज्जन नाहीत ? काय ते सत्पुरुष नाहीत ?

**उत्तर** – का नाहीत, ते देखील सज्जन आहेत, परंतु ते सर्व लौकिक सज्जन आहेत, परंतु येथे तर गोष्ट लोकोत्तर मार्गाची चालू आहे. लोकोत्तर मार्गामध्ये तर त्यांनाच सत्पुरुष म्हटले जाते की, जे मुक्तिच्या मार्गावर स्वतः चालत आहेत आणि जगताला देखील मुक्तीचा मार्ग दाखवित आहेत, जगताला मुक्तीच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत आहेत.

मुक्तीच्या मार्गावर चालण्याची क्रिया-प्रक्रिया स्वाधीन क्रिया आहे, स्वाधीन प्रक्रिया आहे; म्हणून ती उपादानाच्या आश्रयानेच संपन्न होते, निमित्ताच्या आश्रयाने नाही. कल्याणाचे महान काम ज्या उपादानाच्या आश्रयाने, ज्या उपादानाला ध्यानाचे ध्येय आणि श्रद्धेचे श्रद्धेय बनविल्याने संपन्न होते, तो त्रिकाली उपादान तर प्रत्येक व्यक्तिचा स्वतःचा त्रिकाली निज भगवान आत्माच आहे. त्यालाच ध्येय बनविणारी ध्यानपर्याय, त्यालाच ज्ञेय बनविणारी ज्ञानपर्याय, आणि त्यामध्येच आपलेपणा स्थापित करणारी श्रद्धानपर्याय क्षणिक उपादान आहे.

म्हणून त्रिकाली उपादानरूप निज भगवान आत्म्याचे स्वरूप दाखविणारे ज्ञानी पुरुषच ते सत्पुरुष आहेत; ज्यांचा उपदेश मुक्तिच्या मार्गामध्ये निमित्त बनतो तसेच ह्या कारणास्तव ते सुद्धा निमित्त म्हटले जातात. परंतु लक्षात ठेवावे की, तोच उपदेश वास्तविक निमित्त आहे, जो त्रिकाली ध्रुव भगवान

आत्म्याच्या स्वरुपाला स्पष्ट करण्याकरिता दिला गेला आहे, आत्म्याचा अनुभव करण्याच्या प्रेरणेकरिता दिला गेला आहे आणि त्या कारणास्तवच त्यांना मुक्तिच्या मार्गामध्ये निमित्तरुपाने स्वीकारले गेले आहे.

ज्या लोकांना त्या त्रिकाली ध्रुव परमात्म्याचा परिचय (ओळख) च नाही, ज्यांच्या वाणीमध्ये त्याची चर्चा देखील येत नाही, परंतु जे त्याचे नाव ऐकताच, त्याची चर्चा ऐकताच भडकतात, उत्तेजित होतात, अशांत होतात, त्याची चर्चा करणाऱ्यांना बरे-वाईट काहीही म्हणतात; त्यांच्याकरिता तर दिल्ली अजून खूप दूर आहे, ते स्वतःच त्या परमतत्त्वाशी अपरिचित आहेत म्हणून ते मुक्तिमार्गाचे सत्पुरुष कसे असू शकतील ?

ज्यांना त्रिकाली सत्‌चा परिचय नाही, ते सत्पुरुष नाहीत, त्यांची संगति देखील सत्संगति नाही.

मुक्तिच्या अभिलाषी आत्मार्थींना सत्संगति तर अवश्य केली पाहिजे, परंतु सत्संगतिचे खरे स्वरूप समजून सत्पुरुषाची ओळख करुनच त्यांच्या प्रति समर्पित झाले पाहिजे; नाहीतर भ्रमित होण्याची शक्यता सुद्धा काही कमी नाही.

सत्पुरुषाची खरी ओळखच ही आहे की जो त्रिकाली ध्रुवरूप निज परमात्म्याचे स्वरूप दाखवितो आणि त्याच्या शरणामध्ये जाण्याची प्रेरणा देतो, तोच सत्पुरुष आहे. दुनियादारीमध्ये गुरफटविणारे, जगाच्या प्रपंचामध्ये फसविणारे पुरुष कितीही सज्जन असले तरी ते सत्पुरुष नाहीत. ह्याच गोष्टीला चांगल्या तऱ्हेने समजले पाहिजे.

ही गोष्ट लक्षांत ठेवणे अत्यंत जरूर आहे की, आपण सत्संगतिच्या नांवाखाली असत्संगतिच्या फंदात पडत नाही नां ? नाहीतर अत्यधिक मूल्यवान मानव जीवन असेच वाया जाईल, भवाचा अंत होणार नाही. भवाचा अंत आणावयाचा असेल तर निमित्ताधीन दृष्टि सोडून त्रिकाली उपादानरूप निज स्वभावाचा आश्रय घ्या आणि त्याचे स्वरूप समजाविणारे, त्यामध्येच स्थिर होण्याची रममाण होण्याची प्रेरणा देणाऱ्या सत्पुरुषांची संगति करा, समागम करा, त्यांच्या शरणी जा, हाच एक मार्ग आहे, बाकी सर्व उन्मार्ग (चुकीचे मार्ग) आहेत.

**प्रश्न ११** – आपण तर म्हणत आहात की निज भगवान आत्म्याचे स्वरूप सांगणारे सत्पुरुषच एकमेव निमित्त आहेत. परंतु आम्ही तर ऐकले आहे की कुंभारदेखील निमित्त असतो ?

**उत्तर** – तुम्ही बरोबर ऐकले आहे; कारण कुंभारदेखील निमित्त असतो, परंतु कोणत्या कार्याचा? मातीचा घडा बनण्यामध्ये कुंभार निमित्त असतो. घडा बनणे हे एक कार्य आहे त्याचे उपादानकारण माती आहे आणि निमित्तकारण कुंभार – ही गोष्ट सुरूवातीलाच समजावली गेली आहे. परंतु येथे तर सम्यग्दर्शनरूप कार्याची गोष्ट चालू आहे. मोक्षमहालाची पहिली पायरी ह्यारुपाने जे सम्यग्दर्शनरूप कार्य आहे, त्याचे उपादान तर भगवान आत्मा किंवा त्याचा श्रद्धागुणच आहे आणि निमित्त सत्पुरुषाचा त्रिकाली ध्रुव भगवान आत्म्याचा स्वरूप सांगणारा उपदेश आहे.

सम्यग्दर्शनाच्या उत्पत्तिच्या कारणरूपाने जिनागमामध्ये ज्या पांच लब्धिंची चर्चा आढळते, त्यामध्ये एक देशनालब्धिसुद्धा आहे. ती देशनालब्धि आत्म्याचे स्वरूप स्पष्ट करणारी सत्पुरुषाच्या वाणीरुपामध्ये देखील उपलब्ध होते, तिला सम्यग्दर्शनाच्या उत्पत्तिमध्ये बहिरंग निमित्तरुपाने स्वीकारलेले आहे. कारण अंतरंग निमित्त तर दर्शनमोहाचा क्षय, क्षयोपशम किंवा उपशम आहे.

निमित्त आणि उपादान तर कारणाचे प्रकार आहेत; म्हणून ते तर प्रत्येक कार्यावर घटित होतात. जिनागमामध्ये आचार्यांनी घट आणि कुंभाराच्या उदाहरणाने निमित्त-नैमित्तिक संबंधाला समजाविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु ते तर केवळ एक उदाहरण आहे. वास्तविक तर प्रत्येक कार्याचे आपापले अलग-अलग उपादान-निमित्त असते. कार्योत्पत्तिची प्रक्रिया समजण्याकरिता ह्या दोघांना प्रत्येक कार्यावर घटित करून पाहिले पाहिजे. परंतु येथे तर आध्यात्माचे प्रकरण आहे, म्हणून सम्यग्दर्शनरूप कार्यावर उपादान-निमित्ताला घटित केले जात आहे. हा विचार केला जात आहे की जर आपणास सम्यग्दर्शन प्राप्त करावयाचे आहे, तर काय केले पाहिजे ?

ह्या संदर्भामध्ये हे स्पष्ट केले जात आहे की, सम्यग्दर्शनरुप कार्याचे कारण जो त्रिकाली उपादानरुप ध्रुव निज भगवान आत्मा आहे, त्याच्या आश्रयानेच मिथ्यादर्शन पर्यायीचा अभाव करुन सम्यग्दर्शन पर्याय स्वकालामध्ये प्रगट होते. जेव्हा सम्यग्दर्शनरूप पर्याय प्रगट होते तेव्हा मिथ्यात्व नामक कर्माचा क्षय, क्षयोपशम अथवा उपशमरूप अभाव नियमाने होतो. तसेच तत्पूर्वी सम्यग्दर्शन प्राप्त करणाऱ्या त्या जीवाला (आत्म्याला) एखाद्या ज्ञानी सत्पुरुषाकडून भगवान आत्म्याचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या उपदेशाचा लाभदेखील अवश्य प्राप्त होतो.

अशाप्रकारे सम्यग्दर्शनरूप कार्यामध्ये मिथ्यात्व कर्माच्या उदयाचा अभाव अंतरंग निमित्त आहे आणि सत्पुरुषाचा उपदेश बहिरंग निमित्त आहे.

**प्रश्न १२** - जेव्हा सम्यग्दर्शनापूर्वी देशनालब्धिदेखील असतेच आणि त्यामध्ये निमित्त सत्पुरुषाचा उपदेशसुद्धा असतो तर मग सत्पुरुषाचा शोध तर यावा लागेल, सत्पुरुषाची ओळखसुद्धा करावी लागेल. मग आपण असे का म्हणता की आत्मार्थींना निमित्ताच्या शोधार्थ व्यग्र होता कामा नये. (व्यग्र होण्याची गरज नाही).

**उत्तर** - होय, सत्पुरुषाची ओळख तर केलीच पाहिजे. खऱ्या ओळखीशिवाय तर पदोपदी फसविले जाण्याची शक्यता असते. ह्यासाठी खऱ्या देव-शास्त्र-गुरुंच्या श्रद्धेला सम्यग्दर्शन म्हटले आहे; कारण खऱ्यारे देव-शास्त्र गुरुंच्या ओळखीशिवाय सन्मार्गावर येणे सुद्धा संभवत नाही.

आत्मार्थी बंधु-भगिनी ज्ञानी सत्पुरुषाचा शोध देखील सहजभावाने करतातच. येथे न तर सत्पुरुषांच्या ओळखीचा निषेध आहे आणि न शोधण्याचा; परंतु शोधामध्ये व्यग्र होण्याचा तर निषेध आहेच. व्यग्रता तर कोणत्याही परिस्थितीमध्ये ठीक (योग्य) मानली जाऊ शकत नाही.

वास्तविक मुद्दा तर हा आहे की, उपादान आणि निमित्ताचा एक सुमेळ असतो. जेव्हा उपादानाची तयारी होते अर्थात् पर्यायाची पात्रता पक्व (निर्माण)

होते, तेव्हा सत्पुरुषाचा समागमदेखील सहजच प्राप्त होतो, सत्पुरुषाचा शोध देखील सहजपणे सफल होतो. काही देखील असहज (कृत्रिम) होत नाही. सर्व काही सहज (नैसर्गिक) च होते.

त्रिकाली सत्च्या रुचिमध्ये सत्पुरुषाच्या शोधाची प्रक्रिया सहज संपन्न होते, व्यग्रतेने काही होत नाही. आत्महिताचा मार्ग तर सहज होणारा धंदा - (पर्याय) आहे. सत्पुरुषाचा शोध देखील सहज आणि त्रिकाली ध्रुवाची अनुभूति-प्रतीतिदेखील सहज, सर्व काही सहजच सहज आहे.

जेव्हा संसार-सागराचा किनारा समीप येतो तेव्हा सहजपणेच आत्म्याची रुचि जागृत होते. आत्मरुचि, भगवान आत्मा आणि आत्मज्ञ सत्पुरुषाच्या शोधाच्या पुरुषार्थाला प्रेरित करते. सत्पुरुषाच्या समागमाने आत्मरुचिला अभूतपूर्व बल प्राप्त होते. अध्ययन, मनन, चिंतनाची प्रक्रिया परापासून विमुख होऊन स्वोन्मुख होते. रुचिची तीव्रता आणि पुरुषार्थाची प्रबलता दृष्टिला स्वभावसन्मुख तर करतेच, ज्ञान व ध्यान-पर्यायीलादेखील आत्मोन्मुख करते आणि हा निमित्त-उपादानाचा सहज सुमेळ देशनालब्धि पासून करणलब्धि कडे ढळत सम्यक् दर्शन पर्याय प्राप्त करण्याची जोरदार भूमिका तयार करते.

हे सर्व काही सहजच होते, ह्यासाठी म्हटले गेले आहे की, आत्मार्थीला निमित्ताच्या शोधामध्ये व्यग्र होता कामा नये.

क्षयोपशम आणि विशुद्धिलब्धि धारक पुरुषाला सन्मार्गाच्या प्राप्तीचा विकल्प तर असतोच, त्यामुळे शोधाशोध होणे देखील स्वाभाविकच आहे. ह्याच प्रक्रियेमध्ये सत्पुरुषाची शोधाशोध देखील होते, काललब्धिनुसार उपलब्धी देखील होते. सद्गुरुची उपलब्धी आणि त्यांच्या उपदेशाच्या प्राप्तीनंतरदेखील जोपर्यंत करणलब्धिच्या परिणामांची पात्रता पक्व होत नाही; तोपर्यंत अध्ययन मनन, चिंतनाची प्रक्रिया निरंतर चालू राहते. हा काळ अंतर्मुहुर्तदेखील असू शकतो आणि अधिक देखील असू शकतो. परंतु हे सर्व काही तणावाशिवाय अत्यन्त सहजभावाने चालत असते आणि सहजभावानेच चालत राहिले पाहिजे. कारण मुक्तिचा मार्ग शांतिचा मार्ग आहे, तणावाचा नाही, व्यग्रतेचा नाही.

**प्रश्न १३** – जेव्हा कार्याच्या उत्पत्तिमध्ये पाच समवायांचा सहज सुमेळ असतो, निमित्त-उपादानाचा देखील सहज सुमेळ असतो; तर मग असे का म्हटले जाते की, निमित्ताधीन दृष्टि सोडा, त्रिकाली उपादानरुप निज भगवान आत्म्याचा आश्रय घ्या?

**उत्तर** – निमित्त 'पर' आहे, त्यावर दृष्टि ठेवल्याने दृष्टि पराधीन होते. त्रिकाली उपादानरूप निजभगवान आत्मा 'स्व' आहे, त्यावर दृष्टि ठेवल्याने दृष्टि स्वाधीन होते. पराधीनताच दुःख आहे आणि स्वाधीनताच सुख आहे, म्हणून सुखार्थींना तर स्वाधीनताच श्रेयस्कर आहे.

वास्तविक गोष्ट अशी आहे की, जेव्हा करणलब्धिच्या अंतिम समयामध्ये सम्यग्दर्शनाची प्राप्ती होते; तेव्हा ज्ञान, दर्शन, श्रद्धा, चारित्रादि सर्व गुणांची परिणति आत्मसन्मुख होते. त्या समयी त्रिकाली निज भगवान आत्माच ज्ञानाचा ज्ञेय होतो, श्रद्धेचा श्रद्धेय होतो, ध्यानाचा ध्येय होतो.

ज्याप्रमाणे अनुभूतिच्या काळामध्ये सर्व गुणांची परिणति आत्मसन्मुख होते, त्याप्रमाणे सर्व गुणांच्या परिणतिमध्ये निर्मलता देखील प्रगट होते. एवढ्यासाठीच म्हटले जाते की, "सर्व गुणांश समकित" तात्पर्य हे आहे की, सम्यग्दर्शन आत्म्याच्या संपूर्ण गुणांच्या अंशामध्ये स्फुरायमान होते. ज्ञानगुणाची परिणति सम्यग्ज्ञानरूप होते, श्रद्धागुणाची परिणति सम्यग्दर्शनरूप होते, चारित्रगुणाची परिणति सम्यक् चारित्ररुप होते. आनंद (सुख) गुणामध्ये देखील अतींद्रिय आनंद उफाळून येतो. शेवटी अनंतगुणांचा अखंडपिंड संपूर्ण आत्माच सम्यग्दृष्टि होतो नां ?

**प्रश्न १४** – हे तर ठीक आहे, परंतु ज्या सत्पुरुषाने आम्हाला सुखी होण्याचा मार्ग दाखविला, सम्यग्दर्शन प्राप्तीचा उपाय सांगितला, त्यांची उपेक्षा करणे तर ठीक नाही ना ? त्यांना नजरेआड करणे काय कृतघ्नपणा ठरणार नाही?

**उत्तर** – नाही, हा कृतघ्नपणा ठरणार नाही. परंतु हा खरा कृतज्ञपणा आहे. कारण तो सत्पुरुषदेखील तर हीच इच्छा करीत होता की तुम्ही दृष्टिला संपूर्ण

जगापासून हटवून स्वभावसन्मुख करावे. म्हणून हे तर त्यांच्या आज्ञेचे पालन झाले. तुम्हीच सांगा की शिक्षकाच्या आज्ञेचे पालन करणारा शिष्य कृतघ्न असतो की कृतज्ञ ?

गुरु द्रोणाचार्य जेव्हा आपल्या शिष्यांची परिक्षा घेत होते, तेव्हा वृक्षाच्या टोकावर ठेवलेल्या कृत्रिम चिमणीचा डोळा भेदण्याची आज्ञा देतांना त्यांनी आपल्या सगळ्या शिष्यांना हाच एक प्रश्न विचारला होता की, तुम्हाला काय दिसत आहे अर्थात् तुमच्या दृष्टिमध्ये काय आहे ?

ज्या लोकांनी हे उत्तर दिले की, आम्हाला सर्व काही दिसते–वृक्ष, फांद्या, चिमणी, तिचे डोळे आणि गुरुजी तुम्ही सुद्धा! द्रोणाचार्यांनी त्या सर्वांना बाण चालविल्याशिवायच नापास केले आणि अर्जुनाच्या सांगण्यावरुन की फक्त चिमणीचा डोळा दिसतो दुसरे काही नाही.

त्यांनी पुन्हां विचारले – "मी सुद्धां दिसत नाही ?"

"होय, आपणसुद्धा दिसत नाही"– अर्जुनाने हे उत्तर देताच ते म्हणाले – "बाण सोड."

बाण सुटला आणि जाऊन आपल्या योग्य निशाणावर लागला. द्रोणाचार्य त्याच अर्जुनावर प्रसन्न झाले, ज्याने दृढतापूर्वक म्हटले होते की, आपणसुद्धा दिसत नाही. नुसतेच म्हटले नाही तर खरोखरच त्याने दृष्टिच्या विषयामधून त्यावेळी गुरुलासुद्धा पृथक् केलेच होते. लक्ष्यभेदाचा हाच एक उपाय आहे. अर्जुनाचे कृत्य गुरुंची उपेक्षा नसून सर्वाधिक सन्मान होता. कारण त्याने खऱ्या अर्थाने गुरुच्या आज्ञेचे पालन केले होते.

जेव्हा लौकिक कार्याच्या सिद्धिमध्ये देखील, लक्ष्यभेदामध्ये देखील गुरुला दृष्टितून काढणे अनिवार्य असते तर मग आत्मसिद्धि सारख्या महान कार्यामध्ये गुरुदेवाना दृष्टिच्या विषयामध्ये कसे सामील केले जाऊ शकते?

गुरुदेवांच्या सांगितलेल्या मार्गावर चालून त्या लक्ष्याची प्राप्ति करणे की ज्या लक्ष्याच्या प्राप्तिकरिता गुरुदेवानी मार्गदर्शन केले होते, मार्ग दाखविला

होता, सद्‌गुरुंचा खराखुरा सन्मान आहे, ह्यामध्ये त्यांची तसूभर देखील उपेक्षा नाही. कोणाताच गुरु अशी इच्छा करीत नाही की, त्यांचा शिष्य निरंतर गुरुचेच तोंड निहाळत बसावा किंवा त्यांचीच स्तुती करण्यामध्ये दंग रहावा आणि ज्या भगवान आत्म्याचे स्वरूप त्याला समजावलेले आहे, त्याच्या आराधनेमध्ये तत्परच न रहावा.

खऱ्या शिष्याच्या हृदयामध्येदेखील गुरुचे योग्य स्थान आणि सन्मान तर सदैव असतोच आणि वेळोवेळी तो ते अभिव्यक्त देखील करीतच असतो. परंतु अनुभवाच्या काळामध्ये तर ते ज्ञानाचे ज्ञेय देखील रहात नाहीत. - हे देखील परमसत्य आहे. ह्या गोष्टीला देखील आपण चांगल्या तऱ्हेने समजून घेतले पाहिजे.

लक्ष्यभेदासाठी सिद्ध (तयार) होण्यापूर्वी देखील तो गुरुचे स्मरण करु शकतो, करतो; लक्ष्यभेदानंतर देखील करु शकतो, करतो; परंतु लक्ष्यभेदाच्या समयी कदापि नाही. अशाप्रकारे आत्मानुभूती करिता सिद्ध होण्यापूर्वी आणि आत्मानुभूतिनंतर शुभोपयोगामध्ये आल्यानंतर गुरुचे स्मरण संभवते, परंतु आत्मानुभूतीच्या काळामध्ये तर कदापि नाही.

**प्रश्न १५** - गुरुचे स्मरण अगोदर-नंतर (पुढे-मागे) च का ? अनुभूतिच्या काळामध्ये का नाही? सरतेशेवटी निमित्ताची ही उपेक्षा का ?

**उत्तर** - सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीचे कार्य तर आपल्यामध्येच होणार आहे, उपादानामध्येच होणार आहे; गुरुमध्ये नाही, निमित्तामध्ये नाही; आपल्या आश्रयानेच होणार आहे, गुरुच्या आश्रयाने नाही. गुरु तर फक्त मार्गदर्शक आहेत, निमित्तमात्र आहेत न त्यांच्यामध्ये काही होणार आहे न त्यांच्यामुळे काही होणार आहे, जे काही व्हायचे आहे ते आपल्यामध्येच होणार आहे, आपल्यामध्येच होणार आहे, आपल्या आश्रयानेच होणार आहे. त्यांना जे काही सांगावयाचे होते, समजावयाचे होते, सांगितले, समजावले आणि तुम्ही समजून घेतले. आता तुम्ही आपले कार्य करा, गुरुंना का बरे आपल्या बरोबर राखू इच्छिता ? उपयोगामध्ये देखील का ठेवू इच्छिता ?

सूक्ष्मतेने विचार केला तर क्षयोपशमज्ञानवाल्यांना एका समयामध्ये एकच वस्तु उपयोगामध्ये राहते. म्हणून जोपर्यंत गुरुदेखील उपयोगात राहतील, ज्ञानाचे ज्ञेय बनून राहतील, तोपर्यंत दृष्टिचा विषय भगवान आत्मा ज्ञानाचा ज्ञेय बनणार नाही, ध्यानाचा ध्येय बनणार नाही, श्रद्धेचा श्रद्धेय बनणार नाही, तोपर्यंत आत्मानुभूति होणार नाही, सम्यग्दर्शनाची प्राप्ती होणार नाही, संवर होणार नाही, धर्माची सुरुवात होणार नाही.

धर्माचा प्रारंभ करण्याची पद्धतच ही आहे की, प्रथम गुरुपदेशपूर्वक विकल्पात्मक क्षयोपशमज्ञानामध्ये निज शुद्धात्मतत्त्वाचे स्वरूप समजावे, सम्यक् निर्णय करावा, त्यानंतर गुरु आदि समस्त परपदार्थांपासून उपयोग हटवून उपयोगाला आत्मसन्मुख करावे आणि आत्म्यामध्येच तन्मय होऊन जावे. ही आत्मतन्मयताच आत्मानुभूतिचा उपाय आहे, आत्मानुभूति आहे; हाच धर्माचा प्रारंभ आहे, हे च संवर आहे. निरंतर वृद्धिंगत ही आत्मस्थिरताच निर्जरा आहे आणि अनंतकाळपर्यंत आत्म्यामध्येच सामावून जाणेच वास्तविक मोक्ष आहे, जो अनंतसुखस्वरूप आहे आणि प्राप्त करण्याकरिता एकमेव परम-उपादेय आहे.

**प्रश्न १६** – अनुभूतिच्या काळामध्ये ना सही, परंतु अगोदर-नंतर तर वारंवार गुरुचा नामोल्लेख केला पाहिजे ना? परंतु तुमच्यावर हा आरोप लावला जातो की तुम्ही दुसऱ्यांपेक्षा गुरुदेवश्रींचा नामोल्लेख कमी करता. ह्या संबंधी आपले काय म्हणणे आहे ?

**उत्तर** – कमी करतो, परंतु करत तर आहे ना? करीत नाही अशी तर गोष्ट नाही ना ? अरे बंधु! ह्या राग-द्वेषाच्या चर्चेपासून काय लाभ आहे ?

आमचे तर एवढेच म्हणणे आहे की, अधून-मधून वेळो-वेळी गुरुच्या नामोल्लेखालाच गुरुभक्ति समजणाऱ्यांनी आणि अधून-मधून गुरुचा नामोल्लेख न करणाऱ्यांना गुरुद्रोही म्हणणाऱ्यांनी ह्या गोष्टीकडे खास लक्ष दिले पाहिजे की आचार्य कुंदकुंद आणि आचार्य अमृतचंद्र यांच्यासारख्या समर्थ आचार्यांनी

आपल्या गुरुच्या नावाचा उल्लेखसुद्धा कोठेही केलेला नाही. काय त्यांचे कोणी गुरु नसतील काय? काय त्यांच्या हृदयामध्ये आपल्या गुरुबद्दल श्रद्धा नसावी काय? असे असणे तर शक्यच नाही. अहो! श्रद्धा तर हृदयाची गोष्ट आहे. ती दुसऱ्याला दाखविण्यासाठी असत नाही. श्रद्धेचा वारंवार उल्लेख करणारे ह्या तथ्याला समजू शकत नाहीत.

न तर आम्ही यथासमय गुरुदेवश्रींच्या नामोल्लेख करण्यास कधी चुकतो आणि न प्रत्येक गोष्टीत अधून-मधून त्यांच्या नामोल्लेखाची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्नही करतो.

**प्रश्न १७** - प्राप्त करण्याकरिता परम-उपादेय अनंतसुखस्वरूप मोक्षप्राप्तीकरिता निमित्त-उपादानाचे स्वरुप समजण्याची काय आवश्यकता आहे? तात्पर्य हे आहे की, निमित्त उपादानाचे स्वरूप समजण्याने वास्तविक लाभ काय आहे? कारण जोपर्यंत ह्याचा वास्तविक लाभ आणि उपयोगीपणा लक्षात येणार नाही, तोपर्यंत हे समजून घेण्याची रुचि जागृत होणार नाही, चित्त उल्लसित होणार नाही.

**उत्तर** - असे म्हणणे तर एकदम खरे (सत्य) आहे की जोपर्यंत एखाद्या कार्याचा उपयोगीपणा आणि लाभ स्पष्ट लक्षात येत नाही, तोपर्यंत त्या कार्यामध्ये उत्साहपूर्वक प्रवृत्ति होत नाही आणि उत्साहपूर्वक प्रवृत्तिशिवाय कार्यामध्ये साफल्य देखील प्राप्त होत नाही.

म्हणून निमित्त-उपादान जाणण्याचा उपयोगीपणा आणि ते जाणल्याने होणाऱ्या लाभांचा परिचय होणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्येक प्राण्याच्या माथी सर्वात अधिक बोजा (ओझे) कर्तृत्वबुद्धिचे आहे. कर्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त हा प्राणी निरंतर काही ना काही करतच असतो, करतच रहण्याची इच्छा करतो, आणि असे समजतो की जर मी हे सर्व करण्याचे बंद केले तर न जाणो काय होईल? जणुं सर्व काही अस्त-व्यस्त (गडबड-घोटाळा) होऊन जाईल.

ह्या कर्तृत्त्वाच्या ओझ्याखाली प्रत्येक प्राणी दबला जात आहे आणि निरंतर आकुळ व्याकुळ होऊ लागला आहे. त्याला असा विचार करण्याची फुरसतदेखील नाही की ज्या ओझ्याखाली मी दाबला जाऊ लागलो आहे, ते ओझे खरोखरच अस्तित्वात आहे की निव्वळ कोरी कल्पनाच आहे.

निमित्त-उपादानाचे स्वरूप समजल्याने ही गोष्ट अत्यंत स्पष्ट होते की, प्रत्येक पदार्थ स्वतःच्या परिणमनाचाच कर्ता आहे, अन्य पदार्थाच्या परिणमनामध्ये तर तो फक्त निमित्तच असतो, काही करत वगैरे नाही. अशाप्रकारे त्याच्या माथ्यावरील पराच्या कर्तृत्वाचे फार मोठे ओझे स्वाभाविकपणेच उतरुन जाते आणि तो आपल्यामध्ये हलकेपणाचा अनुभव करतो.

अशाप्रकारे जेव्हा तो हे जाणतो की, माझ्या बऱ्या-वाईटपणाची पूर्ण जबाबदारी स्वतःचीच आहे, माझ्या परिणमनामध्ये परपदार्थ तर निमित्तमात्र आहेत; त्यांचा काहीदेखील हस्तक्षेप माझ्यामध्ये होत नाही, तेव्हा ह्या आत्म्याचे अनंतभय तर समाप्त होतेच, शिवाय दुसऱ्यांबद्दल होणारा द्वेषभावदेखील कमी होतो, जवळ-जवळ खलासच होतो; कारण दुसऱ्या पदार्थाविषयी द्वेष तर ह्यामुळेच होत होता, कारण हा समजत होता की ह्याने माझे वाईट केले आहे. जेव्हा ह्याने जाणले की माझे वाईट होण्यामध्ये ह्याचा किंचित् देखील हात नाही तेव्हा स्वाभाविकपणे त्याच्याबद्दलचा द्वेष समाप्त होतो.

अशाप्रकारे जेव्हा हा जाणतो की, एखादा परपदार्थ माझे भलेदेखील करत नाही, न की करुही शकतो, तर मग परपदार्थांबद्दल रागभाव देखील होत नाही. परपदार्थाबद्दल राग-द्वेष होण्यापाठीमागे मूळ कारण तर हा मूढभाव-मिथ्यात्वच असते की, मी पराचे बरे-वाईट करु शकतो, करतो किंवा परपदार्थ माझे बरे-बाईट करु शकतात, करतात.

हा मूढभावच अनंत आकुलतेचे कारण आहे. निमित्त-उपादानाचे खरे स्वरूप समजल्याने हा मूढभाव समाप्त होतो आणि मग त्या मूढभावाने निर्माण होणारी आकुलतादेखील होत नाही.

**प्रश्न १८** - मूढभाव अर्थात् मिथ्यात्व तर आत्मानुभूति शिवाय समाप्त होत नाही असे म्हटले जाते; परंतु इथे तर आपण म्हणत आहात की, निमित्त-उपादानाच्या खऱ्या समजुतीनेच मूढभाव समाप्त होतो ?

**उत्तर** - निमित्त-उपादानाचे स्वरूप समजल्याने निमित्ताधीन दृष्टि समाप्त होते. दृष्टि निमित्तांवरुन हटून त्रिकाली उपादानरूप निजस्वभावाकडे ढळते. निजस्वभावच तर भगवान आत्मा आहे आणि भगवान आत्म्याकडे ढळणारी-झुकणारी दृष्टिच आत्मानुभूतिची पूर्ववर्ती प्रक्रिया आहे. ह्या प्रक्रियेपासून पार होत ज्ञानपर्याय जेव्हा त्रिकाली ध्रुव निजभगवान आत्म्याला सरळ (प्रत्यक्ष) ज्ञेय बनविते. तेव्हा आत्मानुभूति प्रकट होते आणि त्याचसमयी मूढभाव-मिथ्यात्व समाप्त होते.

म्हणून असे म्हणणे असंगत नाही की, निमित्त-उपादानाच्या खऱ्या समजुतीमुळे मूढभाव-मिथ्यात्व समाप्त होते.

अशाप्रकारे आध्यात्मिक सुख-शांतिचा मूळ उपाय निमित्त-उपादान संबंधी खरी समजच आहे. म्हणून ह्याचे स्वरुप समजण्यामध्ये आळस करु नये, कठीण समजून उपेक्षादेखील करता कामा नये, परंतु पुऱ्या ताकदीनिशी ह्याला समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**प्रश्न १९** - निमित्त-उपादानाला समजण्याने आध्यात्मिक सुखशांतिची प्राप्ती होते की लौकिक दृष्टिनेदेखील काही फायदा होतो? तात्पर्य हे आहे की जर आध्यात्मिक सुख-शांतिच प्राप्त होत असेल तर मग आध्यात्मिक लोकच त्यामध्ये गुरफटू द्यावेत, आमच्या सारख्या सर्वसामान्य लोकांनी हे समजण्यामध्ये आपली शक्ति का बरबाद करावी? आपला वेळ का खराब करावा?

**उत्तर** - अरे बाबा ! आध्यात्मिक सुखशांतिच्या व्यतिरिक्त लौकिक फायदे देखील खूप आहेत-लौकिक शांतिदेखील प्राप्त होते. परंतु लौकिक फायदे सांगण्यापूर्वी मी हे सांगू इच्छितो की, आध्यात्मिक सुख-शांतिच खरी सुखशांति आहे. लौकिक सुखशांति तर डोक्यावरील ओझे खांद्यावर ठेवण्यासारखे आहे. ती तर खरी शांतिच नाही.

"आध्यात्मिक लोकांनाच त्यामध्ये गुरफटू द्यावे, आमच्या सारख्या सर्वसामान्य लोकांनी हे समजण्यासाठी आपली शक्ति बरबाद का करावी, आपला वेळ का खराब करावा" - अरे बाबानो ! अशा गोष्टी का बरे करता ? आध्यात्मिक लोक कोणी वेगळे नसतात, त्यांची काही वेगळी गांवे वसलेली नाहीत; जे लोक खरे सुख इच्छितात, शांतिचे इच्छुक आहेत, आपल्या आत्म्याला जाणू-ओळखू पाहतात, ह्या दिशेमध्ये प्रयत्नशील आहेत, सक्रिय आहेत, सज्जन आहेत, ते सगळे आध्यात्मिकच आहेत.

"आम्ही आणि तुम्ही सर्वसामान्य नाही, सगळेच आत्मार्थी आहोत, स्वयं भगवान आहोत. स्वभावतः तर सगळेच भगवान आहेत; पर्यायामध्येदेखील अल्पकाळामध्येच दोन-चार भवामध्येच भगवान बनणारे आहोत." असा का नाही विचार करत. हीन भावना ठेवून - "आम्ही तर सर्वसामान्य लोक आहोत, लौकिक लोक आहोत" - अशा प्रकारच्या गोष्टी करुन निज भगवान आत्म्याचा अपमान का करीत आहात? तीनलोकांचा नाथ ह्या महाप्रभु चैतन्यतत्त्वाला हीन-दीन का समजता आहात? तुम्ही तर अनंतशक्तिचे संग्रहालय आहात, अनंतगुणांचे गोदाम आहात, ज्ञानाचे घनपिंड आहात, आनंदाचे रसकंद आहात अशा हीन गोष्टी बोलणे तुम्हाला शोभा देत नाही. तुम्ही पर्यायीमधील आपलेपणा तोडून स्वभावामध्ये आपलेपणा आणा (साधा), तेव्हाच तुमचा दीनपणा समाप्त होईल.

आश्चर्याची गोष्ट तर ही आहे की, निमित्त-उपादानाच्या स्वरूपाला समजण्यामध्ये लावलेल्या शक्तिला आणि वेळेला तुम्ही शक्तिचा आणि वेळेचा अपव्यय समजता आहात. मी तुम्हाला विचारु इच्छितो की त्या वेळेला आणि शक्तिला वाचवून तुम्ही ते कोठे लावू इच्छिता आहात? आणि ते कोणते स्थान आहे, जेथे तुम्ही आपली शक्ति आणि वेळ लावून त्यांना सार्थक करु शकाल?

निमित्त आणि उपादानाच्या खऱ्या समजुती (ज्ञाना)मध्ये लावलेला उपयोग प्रकारांतराने वीतरागी तत्त्वज्ञानामध्येच लावलेला आहे. ह्यापेक्षा उपयोगाचा चांगला उपयोग दुसरा कोणताच होऊ शकत नाही. हां, आत्मानुभूतिमध्ये

लागलेला उपयोग ह्याहीपेक्षा महान आहे; परंतु हे सर्व काही तर त्यासाठीच आहे. म्हणून निमित्त-उपादानाला समजण्यासाठी लावलेला वेळ आणि शक्ती बरबाद होत (वाया जात)नाही, परंतु हजार पटीने वाढून फलद्रूप होते.

निमित्त-उपादानाच्या चर्चेमध्ये उपयोगाला लावणे उपयोगाला उन्मार्गाला लावणे नाही. सन्मार्गाला लावणे आहे, हा उन्मार्ग नसून सन्मार्ग आहे.

"अनुकूल संयोगसुद्धा लौकिक लाभ आहे" - ह्या दृष्टिने विचार केला तरीदेखील एक गोष्ट अत्यन्त स्पष्ट आहे की, प्रत्येक प्राण्याला अनुकूल संयोग स्वतःच्या उपादानगत योग्यता आणि शुभकर्माच्या उदयाच्या निमित्ताने प्राप्त होतात. जर ह्या गोष्टीला चांगल्याप्रकारे समजून घेतले तर मग आपण अनुकूल संयोगाकरिता, लौकिक सुखाकरिता सुद्धा कुणा दुसऱ्या व्यक्तिसमोर हात पसरणार नाही, हीन-दीन बनून कोणाची गुलामी स्वीकारणार नाही. सद्भाव आणि सत्कर्म करण्याकरिताच प्रेरीत होऊ.

ह्या संदर्भामध्ये समयसार बंधाधिकाराच्या खालील गाथा (हिन्दी पद्यानुवाद) मननीय आहेत.

मैं सुखी करता दुःखी करता हूँ जगत में अन्य को।
यह मान्यता अज्ञान है क्यों ज्ञानियों को मान्य हो॥

हैं सुखी होते दुखी होते कर्म से सब जीव जब।
तू कर्म दे सकता न जब सुख-दुःख दे किस भाँति तब॥

हैं सुखी होते दुःखी होते कर्म से सब जीव जब।
दुष्कर्म दे सकते न जब दुःख दर्द दें किस भाँति तब?॥

हैं सुखी होते दुःखी होते कर्म से सब जीव जब।
सत्कर्म दे सकते न जब सुख-शांति दे किस भांति तब ?॥

जो मरे या जो दुःखी हों वे सब करम के उदय से।
'मैं दुःखी करता मारता' यह बात क्यों मिथ्या न हो?॥

जो ना मरे या दुःखी ना हो सब करम के उदय से।
'ना दुःखी करता मारता' यह बात क्यों मिथ्या न हो ?॥
मैं सुखी करता दुःखी करता हूँ जगत में अन्य को।
यह मान्यता ही मूढ़मति शुभ-अशुभ का बंधन करे।[१]
मैं सुखी करता दुःखी करता बाँधता या छोड़ता।
यह मान्यता है मूढमति मिथ्या निरर्थक जानना॥
जिय बंधे अध्यवसान से शिवपथ-गमन से छूटते।
गहराई से सोचो जरा पर में तुम्हारा क्या चले?॥[२]

उक्त गाथांमधून जे काही सांगितले गेले आहे, त्यावरुन ही गोष्ट अत्यंत स्पष्ट होते की, तुमचे परपदार्थांमध्ये काही देखील चालत नाही आणि तुम्ही दुसऱ्याला सुखी-दुःखी करु शकता, बांधू किंवा सोडू शकता, अथवा दुसरे तुम्हाला सुखी-दुःखी करु शकतात किंवा बांधू-सोडू शकतात - ही मान्यता एकदम खोटी आहे, निरर्थक आहे; कारण प्रत्येक प्राण्याचे जीवन-मरण आणि सुख-दुःख त्यांच्या पर्यायगत योग्यता आणि त्यांच्या कर्मोदयानुसारच होते.

हे निश्चित झाल्यावर, पराच्या कर्तृत्त्वाचा अहंकार आणि परापासून भयाची भावना एकदम समाप्त होते. ह्या कारणास्तव लौकिक शांतिदेखील प्राप्त होते. पराच्या कर्तृत्वाच्या विकल्पाच्या शमनाने आध्यात्मिक कार्यांकरिता वेळ साहजिकच उपलब्ध होऊ लागतो आणि लौकिक जीवनदेखील सुख-शांतिमय होऊन जाते.

**प्रश्न २०** - ह्यामध्ये तर हे म्हटलेले आहे की, आपल्या कर्मोदयानुसार संयोग प्राप्त होतात. ह्यामध्ये विचार करण्यासारखा मुद्दा तर हा आहे की, कर्मदेखील निमित्तच तर आहेत, म्हणून निमित्ताने काही होत नाही - हे कसे काय ?

---

१. समयसार पद्यानुवाद बंधाधिकार गाथा - २५३से २५९
२. समयसार पद्यानुवाद बंधाधिकार गाथा - २६६ व २६७

**उत्तर** - अरे बाबा! संयोग तर आपल्या योग्यतेनुसारच असतात कर्मतर त्यामध्ये निमित्तमात्र आहेत. इथे तर असे सांगितले जात आहे की, प्रत्येक प्राण्याच्या संयोग-वियोगामध्ये, सुख-दु:खामध्ये; उपादान तर तो स्वत: आहे आणि निमित्त त्याचे कर्मोदय आहेत, तुला त्यामध्ये काही करावयाचे नाही. येथे तर त्याच्या निमित्त-उपादान दोहोंना सांगून त्याच्या कर्तृत्त्वाच्या चिंतेपासून तुला मुक्त केले जात आहे. तू ह्या गोष्टीकडे ध्यान तर देत नाहीस आणि त्या कथनामधून निमित्तावर जोर देत आहेस. ते कथन निमित्तावर जोर देण्यासाठी केलेले नाही, परंतु त्यामध्ये तर कर्तृत्त्वाच्या ओझ्याखाली दबलेल्या ह्या प्राण्याचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कार्योत्पत्तिमध्ये निमित्त-उपादानाचे केवढे, काय आणि कसे स्थान आहे - ही गोष्ट तर फार पूर्वी स्पष्ट केलेली आहे. येथे देखील तदनुसारच समजावे. येथे तर हे सांगितले जात आहे की तू निश्चिंत रहा, तुला परामध्ये काही करायचे नाही; त्याचे निमित्तउपादान तुझ्यापेक्षा वेगळे आहेत आणि ते आपापले काम मोठ्या उत्तमप्रकारे निभावून नेत आहेत, तुला तेथे गुरफटण्याची आवश्यकता नाही.

अरे बंधु! निमित्त आणि उपादानाचे खरे स्वरूप समजण्यामध्ये लौकिक आणि पारलौकिक लाभच लाभ आहे, म्हणून त्यांचे स्वरूप समजण्यामध्ये उपयोगाला लाव, तुला निश्चितपणेच लौकिक आणि पारलौकिक सुखशांती प्राप्त होईल. अधिक संकल्प-विकल्पामध्ये गुरफटण्यात काही लाभ (राम) नाही.

निमित्त-उपादानाचे स्वरुप स्पष्ट करणे आणि त्यासंबंधी उठणाऱ्या शंका-आशंकांचे निराकरण करण्यामध्ये जे काही शक्य होते तेवढा प्रयत्न केलेला आहे, आता आणखीन अधिक विस्ताराचे काही देखील प्रयोजन नाही.

ह्या पवित्र भावनेने विराम घेतो की, सर्व आत्मार्थी लोक निमित्त-उपादानाचे खरे स्वरूप समजून लौकिक आणि पारलौकिक सुख-शांति प्राप्त करोत!

**ॐ शांति, शांति, शांति.**

परिशिष्ट - १

# उपादान-निमित्त दोहा

- कविवर पंडित बनारसीदास

गुरु उपदेश निमित्त बिन उपादान बलहीन ।
ज्यों नर दूजे पाँव बिन चलवे को आधीन ॥ १ ॥

हों जाने था एक ही उपादान सों काज ।
थकै सहाई पौन बिन पानी मांहि जहाज ॥ २ ॥

ज्ञान नैन किरिया चरण दोऊ शिवमग धार
उपादान निश्चय जहाँ तहाँ निमित्त-व्यवहार ॥ ३ ॥

उपादान निजगुण जहाँ तहाँ निमित्त पर होय ।
भेदज्ञान परमाण विधि विरला बूझे कोय ॥ ४ ॥

उपादान बल जहाँ तहाँ नहि निमित्त को दाव ।
एक चक्र सौं रथ चले रवि को यहै स्वभाव ॥ ५ ॥

सधै वस्तु असहाय जहाँ तहाँ निमित्त है कौन ।
ज्यों जहाज परवाह में तिरै सहज बिन पौन ॥ ६ ॥

उपादान विधि निरवचन है निमित्त उपदेश ।
वसे जु जैसे देश में धरे सु तैसे भेष ॥ ७ ॥

---

परिशिष्ट - २

# उपादान-निमित्त दोहा

- भैया भगवतीदास

पाद प्रणमि जिनदेव के, एक उक्ति उपजाय ।
उपादान अरु निमित्त को, कहुँ संवाद बनाय ॥ १॥

पूछत है कोऊ तहाँ, उपादान किह नाम ।
कहो निमित्त कहिये कहा, कब के हो इह ठाम ॥ २॥

उपादान निज शक्ति है, जिय को मूल स्वभाव ।
है निमित्त परयोग तैं, बन्यो अनादि बनाव ॥ ३॥

निमित्त कहे मोको सबै, जानत है जगलोय ।
तेरो नाव न जानही उपादान को होय ॥ ४॥

उपादान कहै रे ! निमित्त, तू कहा करै गुमान ।
मोको जानें जीव वे, जो है सम्यक् वान ॥ ५॥

कहैं जीव सब जगत के, जो निमित्त सोई होय ।
उपादान की बात को, पूछे नाही कोय ॥ ६॥

उपादान बिन निमित्त तू, कर न सके इक काज ।
कहा भयो जग ना लखै, जानत है जिनराज ॥ ७॥

देव-जिनेश्वर गुरु-यती, अरु जिन-आगमसार ।
इह निमित्त तैं जीव सब, पावत है भव-पार ॥ ८॥

यह निमित्त इह जीव के, मिल्यौ अनन्तीबार ।
उपादान पलट्यौ नही, तो भटक्यौ संसार ॥ ९॥

कै केवलि कै साधु के निकट भव्य जो होय ।
सो क्षायिक सम्यक् लहै, यह निमित्त बल जोय ॥ १०॥

केवलि अरु मुनिराज के, पास रहे बहु लोय ।
पै जाको सुलट्यौ धनी, क्षायिक ताकों होय ॥ ११॥

हिंसादिक पापन किये, जीव नरक में जाहिं।
जो निमित्त नही काम को, तो इम काहे कहाहि ॥ १२ ॥

हिंसा में उपयोग जहाँ, रहे ब्रह्म का राच ।
तेई नरक में जात है, मुनि नहिं जाहिं कदाच ॥ १३ ॥

दया-दान-पूजा किये जीव सुखी जग होय ।
जो निमित्त झूठौ कहौ, यह क्यों माने लोय ॥ १४॥

दया-दान-पूजा भली, जगत माहि सुखकार ।
जहाँ अनुभव को आचरण, तहँ यह बन्ध विचार ॥ १५ ॥

यह तो बात प्रसिद्ध है, सोच देख उर माहिं ।
नरदेही के निमित्त बिन, जिय क्यों मुक्ति न जाहिं ॥ १६ ॥

देह पिंजरा जीवको, रोके शिवपुर जात ।
उपादान की शक्ति सों, मुक्ति होत रे भ्रात ॥ १७॥

उपादान सब जीव पै, रोकन हारो कौन ।
जाते क्यों नहिं मुक्ति में, बिन निमित्त के हौन ॥ १८ ॥

उपादान सु अनादि को, उलट रह्यौ जगमाहिं ।
सुलटत ही सूधे चले, सिद्ध लोक को जाहिं ॥ १९ ॥

कहो अनादि निमित्त बिन, उलट रह्यो उपयोग ।
ऐसी बात न संभवै, उपादान तुम जोग ॥ २० ॥

उपादान कहे रे निमित्त, हम पै कही न जाय ।
ऐसी ही जिन केवली, देखे त्रिभुवन राय ॥ २१ ॥

जो देख्यो भगवान ने, सो ही साँची आहि ।
हम-तुम संग अनादि कै, बली कहोगे काहि ॥ २२ ॥

उपादान कहे वह बली, जाको नाश न होय ।
जो उपजत विनशत रहे, बली कहाँ तै सोय ॥ २३ ॥

उपादान तुम जोर हो, तो क्यों लेत अहार ?
पर निमित्त के योग सों, जीवत सब संसार ॥ २४॥

जो अहार के जोग सों, जीवत हैं जगमाहिं ।
तो वासी संसार के, कोऊं मरते नाहिं ॥ २५॥

सूर सोम मणि अग्नि के, निमित्त लखें ये नैन ।
अन्धकार में कित गयो, उपादान दृग, दैन ॥ २६॥

सूर सोम मणि अग्नि जो, करे अनेक प्रकाश ।
नैन शक्ति बिन ना लखैं, अन्धकार सम भास ॥ २७॥

कहै निमित्त वे जीव को मो बिन जग के माहिं ।
सबै हमारे वश परे, हम बिन मुक्ति न जाहिं ॥ २८॥

उपादान कहै रे निमित्त ! ऐसे बोल न बोल ।
तोको तज निज भजत है, ते ही करें किलोल ॥ २९॥

कहै निमित्त हम को तजै, ते कैसे शिव जात ।
पंच महाव्रत प्रगट है, औरहु क्रिया विख्यात ॥ ३०॥

पंच महाव्रत जोग त्रय, और सकल व्यवहार ।
पर कौ निमित्त खिपाय के, तब पहुँचे भव-पार ॥ ३१॥

कहै निमित्त जग में बड्यौ मो तैं बडौ न कोय ।
तीन लोक के नाश सब, मो प्रसाद तैं होय ॥ ३२॥

उपादान कहै तू कहा, चहुँ गति में ले जाय ।
तो प्रसाद तें जीव सब, दुःखी होंहि रे भाय ॥ ३३॥

कहै निमित्त जो दुःख सहै, सौ तुम हमहिं लगाय ।
सुखी कौन तैं होत हैं, ताको देहु बताय ॥ ३४॥

जो सुख को तू सुख कहै, सो सुख तो सुख नाही ।
ये सुख तो दुःख-मूल हैं, सुख अविनाशी माहिं ॥ ३५॥

अविनाशी घट-घट बसे, सुख क्यों विलसत नाहि ।
शुभ निमित्त के योग बिन, परे-परे बिललाहिं ॥ ३६ ॥

शुभ निमित्त इह जीव को, मिल्यौ अनन्ती बार ।
पै इक सम्यग्दर्शन बिन, भटकत फिर्‌यौ गंवार ॥ ३७ ॥

सम्यग्दर्शन भये कहा, त्वरित मुक्ति में जाहिं ।
आगे ध्यान निमित्त है, ते शिव को पहुँचाईं ॥ ३८ ॥

छोरी ध्यान की धारणा, मोरि योग की रीत ॥
तोरि कर्म के जाल को, जोरि लई शिव प्रीत ॥ ३९ ॥

तब निमित्त हार्यो तहाँ, अब नाही जोर बसाय ।
उपादान शिवलोक में, पहुँच्यौ कर्म खिपाय ॥ ४० ॥

उपादान जीत्यो तहाँ, निज बल कर परकास ।
सुख अनन्त ध्रुव भोगवे, अन्त न बरन्यौ तास ॥ ४१ ॥

उपादान अरु निमित्त ये, सब जीवन पै वीर ।
जो निज शक्ति सँभारही, सो पहुँचे भवतीर ॥ ४२ ॥

'भैया' महिमा ब्रह्म की, कैसे वरनी जाय ?
वचन अगोचर वस्तु है, कहिबी वचन बताय ॥ ४३ ॥

उपादान अरु निमित्त को, सरस बन्यौ संवाद।
समदृष्टि को सरल है, मूरख को बकवाद ॥ ४४ ॥

जो जानै गुण ब्रह्म के, सो जाने यह भेद ।
साख जिनागम सौं मिले, तो मत कीज्यौ खेद ॥ ४५ ॥

नगर आगरा अग्र है, जैनी जन को वास ।
तिह थानक रचना कही, 'भैया' स्वमति प्रकास ॥ ४६ ॥

संवत विक्रम भूप को, सत्तरह सै पंचास ।
फाल्गुन पहले पक्ष में, दशों दिशा परकास ॥ ४७ ॥

# डॉ. हुकमचन्द भारिल्ल के महत्त्वपूर्ण प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| १. | समयसार अनुशीलन भाग-१ (१ से ६८ गाथा तक) | २०.०० |
| २. | समयसार अनुशीलन भाग-२ (६९ से १६३ गाथा तक) | २०.०० |
| ३. | परमभाव प्रकाशक नयचक्र | १६.०० |
| ४. | पण्डित टोडरमल : व्यक्तित्व और कर्तृत्व | ११.०० |
| ५. | आत्मा ही है शरण | १२.०० |
| ६. | सत्य की खोज (हिन्दी, गुजराती, मराठी, तमिल, कन्नड़) | १२.०० |
| ७. | धर्म के दशलक्षण (हिन्दी, गुजराती, मराठी, कन्नड़, तमिल, अंग्रेजी) | १०.०० |
| ८. | तीर्थंकर भगवान महावीर और उनका सर्वोदयतीर्थ (हिन्दी, गुजराती, मराठी, कन्नड़, अंग्रेजी) | ७.०० |
| ९. | वीतराग-विज्ञान प्रशिक्षण निर्देशिका | ७.०० |
| १०. | बारह भावना : एक अनुशीलन | ६.०० |
| ११. | आप कुछ भी कहो (हिन्दी, गुजराती, मराठी, कन्नड़, अंग्रेजी) | ६.०० |
| १२. | क्रमबद्धपर्याय (हिन्दी, गुजराती, मराठी, कन्नड़, तमिल, अंग्रेजी) | ५.०० |
| १३. | गागर में सागर | ५.०० |
| १४. | आचार्य कुन्दकुन्द और उनके पंच परमागम | ५.०० |
| १५. | पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव (हिन्दी, गुजराती, मराठी, कन्नड़) | ५.०० |
| १६. | निमित्तोपादान | २.५० |
| १७. | अहिंसा : महावीर की दृष्टि में (हिन्दी, मराठी, गुजराती, अंग्रेजी) | २.५० |
| १८. | युगपुरुष कानजीस्वामी (हिन्दी, गुजराती, मराठी, कन्नड़) | ५.०० |
| १९. | चैतन्य चमत्कार | २.०० |
| २०. | पण्डित टोडरमल : जीवन और साहित्य | २.०० |
| २१. | मैं कौन हूँ (हिन्दी, गुजराती, मराठी, कन्नड़, तमिल, अंग्रेजी) | ३.०० |
| २२. | बालबोध पाठमाला भाग-२ (हि., गु., म., क., त., बं., अं.) | ३.०० |
| २३. | बालबोध पाठमाला भाग-३ (हि., गु., म., क., त., बं., अं.) | ३.०० |
| २४. | वीतराग-विज्ञान पाठमाला भाग-१ (हि., गु., म., क., अं.) | ४.०० |
| २५. | वीतराग-विज्ञान पाठमाला भाग-२ (हि., गु., म., क., अं.) | ४.०० |
| २६. | वीतराग-विज्ञान पाठमाला भाग-३ (हि., गु., म., क., अं.) | ४.०० |
| २७. | तत्त्वज्ञान पाठमाला भाग-१ (हि., गु., म., क., अं.) | ४.०० |
| २८. | तत्त्वज्ञान पाठमाला भाग-२ (हि. गु., म., क., अं.) | १.५० |
| २९. | सार समयसार | २.०० |
| ३०. | शाश्वत तीर्थधाम : सम्मेदशिखर | १.२५ |
| ३१. | कुन्दकुन्द शतक (अर्थ सहित) | १.२५ |
| ३२. | समयसार पद्यानुवाद | १.०० |
| ३३. | योगसार पद्यानुवाद | १.०० |
| ३४. | बारह भावना एवं जिनेन्द्र वन्दना | १.०० |
| ३५. | शुद्धात्म शतक (अर्थ सहित) | १.०० |
| ३६. | तीर्थंकर भगवान महावीर | १.०० |
| ३७. | अनेकान्त और स्याद्वाद | १.५० |
| ३८. | शाकाहार : जैनदर्शन के परिप्रेक्ष्य में | १.०० |
| ३९. | अर्चना (जेवी साइज) | १.०० |
| ४०. | गोम्मटेश्वर बाहुबली | १.०० |
| ४१. | वीतरागी व्यक्तित्व : भगवान महावीर (हिन्दी, गुजराती) | |